रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग ▌आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ ▌वर्ष ८७ ▌अंक २९६ ▌पृष्ठे ८ ▌ MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in

कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २ एप्रिल २०२४

किंमत ४ ₹

## केजरीवालांचा पाडवा तुरुंगातच

**नवी दिल्ली :** ईडीने २१ मार्च रोजी केजरीवाल यांना त्यांच्या निवासस्थानातून अटक केली होती. २८ मार्च रोजी झालेल्या शेवटच्या सुनावणीत अंमलबजावणी संचालनालयाने केजरीवाल यांच्या सात दिवसांची कोठडी मागितली होती. मात्र, न्यायालयाने त्यांना १ एप्रिल रोजी हजर राहण्याचे आदेश दिले होते. यानंतर सोमवारी त्यांना कोर्टात हजर करण्यात आले. आता न्यायालयाने केजरीवाल यांना १५ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. त्यामुळे आता १५ एप्रिलपर्यंत केजरीवालांचा मुक्काम तिहार जेलमध्येच असणार आहे.

## आ. चंद्रकांत पाटलांच्या गाडीला अपघात

**जळगाव :** मुक्ताईनगरचे शिंदे गटाचे आमदार चंद्रकांत पाटील यांच्या गाडीला सोमवारी दुपारी अपघात झाला. या अपघातामध्ये चंद्रकांत पाटील यांना किरकोळ दुखापत झाली आहे. मुक्ताईनगर तालुक्यातील जुना कुंड रस्त्यावर हा अपघात घडला. चंद्रकांत पाटील यांच्याच ताफ्यातील दोन गाड्या एकमेकांवर आदळल्यामुळे ही दुर्घटना घडली. प्राथमिक माहितीनुसार, या अपघातामध्ये चंद्रकांत पाटील यांच्यासह सुरक्षा वाहनातील तीन पोलीस कर्मचारी जखमी झाले आहेत. चंद्रकांत पाटील यांना किरकोळ दुखापत झाली आहे.




**आजचा अग्रलेख**
**यापेक्षा ब्रिटिश बरे होते**

**वेधक**

### लोकसभेसाठी एम-३ बनावटीचे ईव्हीएम यंत्र

**। रायगड । खास प्रतिनिधी ।**
लोकसभा निवडणुकीसाठी राजकीय पक्षांनी प्रचाराला सुरुवात केली आहे. दुसरीकडे निवडणूक विभागही कामाला लागला आहे. २०१९ साली पार पडलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत प्रथमच मतदान यंत्रबरोबरच व्हीव्हीपॅट यंत्रचा वापर करण्यात आला होता. भारतीय निवडणूक आयोगाने २०२४ लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी एम-३ बनावटीचे ईव्हीएम यंत्र आणि व्हीव्हीपॅट यंत्र वापरण्याचे निर्देश दिले आहेत.

रायगड जिल्ह्यात २६९४ मतदान केंद्रे आहेत. त्यानुसार रायगड लोकसभेसाठी तब्बल सात हजार ५२ मतदान यंत्र, चार हजार ४५ कंट्रोल युनिट आणि चार हजार २२२ व्हीव्हीपॅट यंत्र प्राप्त झाले असल्याची माहिती उपजिल्हाधिकारी (निवडणूक) स्नेहा उबाळे यांनी 'कृषीवल'शी बोलताना दिली.

### प्रकाश शेंडगे निवडणुकीच्या रिंगणात

**। सांगली । प्रतिनिधी ।**
लोकसभेसाठी सांगली मतदार संघातून आपण उतरणार असल्याचे ओबीसी बहुजन पार्टीचे संस्थापक प्रकाश शेंडगे यांनी घोषणा केल्याने सांगलीची लढत आता बहुरंगी होणार आहे. महाविकास आघाडीमधील ठाकरे शिवसेना आणि काँग्रेस यांच्यात सुरू असलेली चुरस अद्याप संपलेली नसताना शेंडगे यांच्या उमेदवारीने कोणाला फटका आणि कोणाला लॉटरी लागते हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे. शेंडगे यांनी जर सांगलीतून ओबीसी बहुजन पार्टीच्यावतीने निवडणूक लढविण्याचा निर्णय घेतला, तर त्यांना आपला पाठिंबा राहील, अशी घोषणा गेल्या आठवड्यात वंचित बहुजन आघाडीचे नेते अ‍ॅड. प्रकाश आंबेडकर यांनी केली होती. आंबेडकर यांनी घोषणा केल्यानंतर बहुजन वंचितची मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्याशी कितपत आघाडी होते हे पाहूनच याबाबतचा निर्णय आपण घेऊ असे सांगत शेंडगे यांनी काही काळ जाऊ दिला. जरांगे पाटील यांनी लोकसभा निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर शेंडगेंनी तात्काळ निर्णय जाहीर केला.

## खारेपाटातील पाणीप्रश्नाच्या श्रेयासाठी

# तटकरे पितापुत्र हपापलेले

**। पेण । प्रतिनिधी ।** लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार सुनील तटकरे यांना खारेपाटातील पाणीप्रश्नाची आता आठवण झाली आहे. तटकरेंनी आपल्या खासदारकी आणि राज्यात मंत्री असतानाच्या कार्यकाळात येथील पाणीप्रश्नासाठी काहीच केले नाही. एक छदामही दिला नसताना, आता श्रेय घेण्यासाठी पुढे येत आहेत, अशी टीका शेकापचे युवा नेते तथा पेण पंचायत समितीचे सदस्य निळकंठ दिवेकर यांनी केली आहे. पाणीप्रश्नावर समाजमाध्यमांवर सुरू असलेल्या श्रेयवादावर त्यांनी विरोधकांचा खरपूस समाचार घेत शेतकरी कामगार पक्षाने येथील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी आवाज उठविल्याची रोखठोख प्रतिक्रिया दिवेकर यांनी 'कृषीवल'ला दिली.

### निलकंठ दिवेकरांचे जोरदार टीकास्त्र

पेण खारेपाटाच्या पाणीप्रश्नावर सध्या तरी समाजमाध्यमांवर श्रेयवादाची ठिणगी पडली आहे. खासदार सुनील तटकरे आणि आमदार अनिकेत तटकरे खारेपाटातील पाणीप्रश्न सोडवण्याचा श्रेय घेण्यासाठी हापापलेले दिसत आहेत. समाज माध्यमांवर न केलेल्या कामांचे श्रेय घेत आहेत. परंतु, सुनील तटकरे यांनी जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असल्यापासून आतापर्यंत छदामभर पैसासुद्धा खारेपाटाचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी खर्च केलेला नाही आणि आज कागदी घोडे नाचवून श्रेय घेण्याचा प्रयत्न करतात, असा आरोपही दिवेकर यांनी केला आहे. तर, दुसरीकडे आमदार रविशेठ पाटील यांच्या सूनबाई प्रीतम पाटीलही आपल्या फेसबुक व इंस्टाग्रामवरून आपल्या सासऱ्यांनी पाणीप्रश्न सोडवल्याचा गाजावाजा करत आहेत. परंतु, खारेपाटासाठी ना काँग्रेस, ना राष्ट्रवादी, ना भाजपने अथवा यांच्या नेत्यांनी पाणीप्रश्न सुटावा म्हणून प्रामाणिक प्रयत्न केले नाहीत, असे परखड मत दिवेकर यांनी व्यक्त केले.



खा. सुनील तटकरे हे या राज्याचे कित्येक वर्षे मंत्री होते, तर जिल्ह्याचे पालकमंत्री होते. काही काळ राज्याची तिजोरी यांच्याच ताब्यात होती, मग त्यावेळी खारेपाटातील पाणीप्रश्न का आठवला नाही. आता यांना लोकसभेला मतं हवीत म्हणून खारेपाटातील पाणीप्रश्न आठवला का, असा सवाल •› पान २ वर

### श्रेयासाठी जनतेची दिशाभूल

**पेण तालुक्यातील खारेपाटाचा पाणीप्रश्न सोडवण्यासाठी शेकाप सरचिटणीस आ. जयंत पाटील यांनी निधीची उपलब्धता एमएमआरडीमधून होईल, याबाबत सखोल माहिती मुख्यमंत्र्यांना दिली आणि नंतर मुख्यमंत्र्यांनी ते मान्य करून तशा प्रकारचा आदेश दिला. त्या निधीचा योग्य वापर करता आलाच नाही म्हणून आजतागायत खारेपाटाचा पाणीप्रश्न रेंगाळत पडलाय. महत्त्वाची बाब म्हणजे, हेटवणे सिंचन क्षेत्राखाली खारेपाटातील जमीन असताना पाणी उपलब्ध झाले नाही. राज्याचे सिंचन मंत्री तटकरे साहेब होते, मग कालव्याची कामे पूर्ण का झाली नाहीत. अर्थ खाते, सिंचन खाते आपल्याकडे होते, मग त्यावेळेला खारेपाटचा प्रश्न का सोडवता आला नाही. जर कुणी श्रेय घेण्याचा प्रयत्न करत असेल, तर ते चुकीचे आहे. खारेपाटातील जनता सुज्ञ आहे, आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाच्या माध्यमातून योग्य ते उत्तर देईलच. परंतु, खासदारसाहेबांच्या बगलबच्च्यांना एवढेच सांगणे आहे, चुकीच्या पद्धतीने लोकांची दिशाभूल करणारे मेसेज समाज माध्यमांवर फिरवत आहात ते थांबवा, कारण येथील जनतेला सगळं माहिती आहे, असे दिवेकर म्हणाले.**

## तटकरे विश्वासघातकी

**। पेण । प्रतिनिधी ।**
रायगड लोकसभा मतदारसंघात सुनील तटकरे यांना महायुतीमधून उमेदवारी दिल्याने कार्यकर्ते विरुद्ध नेते अशी लढाई रंगलेली पाहायला मिळत आहे. नेते मंडळींची गळाभेट झाली; परंतु कार्यकर्ते मानायला तयार नाहीत. धैर्यशील पाटील यांना उमेदवारी न मिळाल्याने भ्रमनिरास झालेले भाजपचे कार्यकर्ते संतापले आहेत. खा. तटकरे विश्वासघातकी असून, त्यांच्यावर आम्ही विश्वास कसा ठेवणार, असा घणाघात पेण तालुका भाजप युवा मोर्चाचे अध्यक्ष स्वप्निल म्हात्रे यांनी केला.



दर वेळेला शब्द फिरवण्याचे राजकारण करणाऱ्या सुनील तटकरेंचा पराभव झाल्यास रायगडला, खऱ्या अर्थाने राजकारणात युवकांना नवसंजीवनी मिळेल. आजपर्यंत रायगडच्या तरुण राजकीय मंडळीला संपवण्याचे काम खासदारांनी केलेले आहे. ज्यांनी ज्यांनी यांना मदतीचा हात दिला, त्यांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. खासदारांना पुन्हा महायुतीमधून उमेदवारी दिली असेल; परंतु आम्हा कार्यकर्त्यांना कदापि मान्य नाही. ज्या व्यक्तीने आपल्या राजकीय दोन्ही गुरूंवर (बॅ. ए.आर.अंतुले साहेब, शरद पवार साहेब) यांच्यावर कुरघोडी केली. तसेच मित्र समजणाऱ्या जयंतभाईंचा विश्वासघात केला, अशा विश्वासघातकी माणसावर आम्ही विश्वास का ठेवावा?

### स्वप्निल म्हात्रेंचा घणाघात

**गेल्या २०१९ च्या निवडणुकीत पेण तालुक्याने चांगलं मताधिक्य दिलं; परंतु विधानसभेला आमच्याविरुद्ध काम केले. गेल्या निवडणुकीत शेकापची मदत घेतली. या निवडणुकीत आता भाजपची मदत घेणार. दर वेळेला दुसऱ्याच्या मदतीने निवडून यायचे आणि नंतर पाठ फिरवायची. यावेळेला हे चालणार नाही. आम्ही मदतीचा हात देणार नाही. विश्वासघातकी माणसावर आम्ही विश्वास ठेवणार नाही.**
**– स्वप्निल म्हात्रे**

## शिवाजी पार्कसाठी जोरदार रस्सीखेच

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
लोकसभा प्रचारासाठी मनसेकडून १७ मे रोजी जाहीर सभेचे आयोजन केले असून, या सभेसाठी शिवाजी पार्क मैदान मिळावे म्हणून महापालिकेकडे अर्ज केला आहे. मात्र, त्याच दिवशी शिवसेना ठाकरे गटानेही शिवाजी पार्कवर सभा घेण्यासाठी पालिकेकडे शिवाजी पार्क मैदानाची मागणी केली आहे. दोन्ही पक्षांच्या सभांची तारीख एकच असून, त्यांनी एकाच दिवशी म्हणजे १८ मार्च रोजी महापालिकेकडे अर्ज केला आहे. यामुळे या मैदानासाठी संघर्ष पाहायला मिळत आहे.

दोन्ही अर्ज एकाच दिवशी प्राप्त झाल्याने तसेच एकाच तारखेला सभा असल्याने मैदान कोणाला द्यायचे याचा •› पान २ वर

### ठाकरे गट व मनसेकडून अर्ज

### मनसेच्या भूमिकेकडे लक्ष

**९ एप्रिल रोजी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पाडवा मेळावा शिवतीर्थावर होत आहे. राज ठाकरेंनी दिल्लीत जाऊन घेतलेली अमित शहांची भेट व त्यांच्या महायुतीत सामील होण्याच्या होत असलेल्या चर्चा, या पार्श्वभूमीवर राज ठाकरे पाडवा मेळाव्यातून काय घोषणा करणार याची उत्सुकता आहे.**

## उद्धव ठाकरेंकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन





**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्राच्या माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील, शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या मीनाक्षी पाटील यांच्या निधनानंतर गेल्या चार दिवसांपासून राजकीय, सामाजिक आदी विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन केले जात आहे. शिवसेना नेते उद्धव ठाकरे यांनी सोमवारी (दि. १) पेझारी येथे जाऊन आ. जयंत पाटील, माजी आ. पंडित पाटील, मीनाक्षी पाटील यांचे सुपुत्र शेकाप जिल्हा चिटणीस अ‍ॅड. आस्वाद पाटील यांचे सांत्वन केले.



• (छायाचित्र : समीर मालोदे)

मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) मार्च रोजी दीर्घ आजारामुळे वयाच्या ७६ व्या वर्षी निधन झाले. मीनाक्षी पाटील यांच्या निधनाची माहिती मिळताच शिवसेनेचे नेते उद्धव ठाकरे यांनी सोमवारी पेझारी येथे जाऊन पाटील कुटुंबियांची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. त्यांच्यासमवेत खासदार संजय राऊत, मिलिंद नार्वेकर, माजी आ. निर्मला गावीत, शिवसेनेचे रायगड •› पान २ वर

## भाजपरूपी बकासुराच्या वधासाठी भीमरूपी जनता सज्ज

### लोहारे येथील जनसंवाद दौऱ्यात अनंत गीते कडाडले

**। पोलादपूर । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्रामध्ये १०६ आमदार असल्याने सत्तेपासून दूर राहिलेल्या भाजप आणि फडणवीसांनी अनेक वर्षे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेच्या मदतीने सत्ता मिळवली, त्या शिवसेनेसमोर मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन, अशी सत्तेची लालसा व्यक्त केली आणि पुन्हा सत्तेत येता आले नाही म्हणून शिवसेना फोडून सत्ता मिळवली. परंतु, ही सत्ता अल्पायुषी ठरेल, अशी शंका वाटल्याने राष्ट्रवादी काँग्रेस फोडली. यामुळे केवळ सत्तालालसेपोटी महाराष्ट्रातील आणि देशातील पक्ष फोडून भाजपाने त्या पक्षांतील भ्रष्ट लोक घेऊन लोकसभेनंतरच्या सत्तेची गणितं जमविण्यासाठी प्रयत्न चालविले आहेत, या प्रयत्नांना बकासुरासारखे स्वरूप आले आहे. पक्ष फोडा आणि भाजप वाढवा, असे गलिच्छ राजकारण भाजप करीत आहे. त्यामुळे या भाजप अन् फडणवीसरूपी बकासुराच्या वधासाठी भीमरूपी जनता सज्ज असल्याचा ठाम विश्वास शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष आणि इंडिया आघाडीचे उमेदवार माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांनी व्यक्त केला.



• (छायाचित्र : शैलेश पालकर)

### 'सैतानाला बाटलीबंद करा, बूच लावण्याचे काम मी करेन'

**महाड विधानसभा मतदार संघाचे माजी आमदार माणिकराव जगतापांची एक व्हिडीओ क्लीप फिरतेय. माणिकरावांनी जाता जाता सांगितले की, गीतेंसारख्या चारित्र्यवान नेत्याला पराभूत करण्याचे पाप घडले. आता सैतानाला बाटलीबंद करण्याचे काम उर्वरित काळात करणार. आता तोच सैतान आपणासमोर निवडणुकीत उमेदवार असल्याने ते सैतानाला बाटलीबंद करण्याचे काम मतदार करतील आणि मतदानानंतर त्या बाटलीला बूच लावण्याचे काम मीच करणार, असा निर्धार अनंत गीते यांनी साखर येथे केला.**

पोलादपूर तालुक्यातील लोहारे येथे जनसंवाद दौऱ्यामध्ये माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते यांच्यासमवेत व्यासपीठावर जिल्हा प्रमुख अनिल नवगणे, जिल्हासंपर्कप्रमुख संजय मानाजी कदम, जिल्हा उपसंघटक बाळ राऊळ, महाड विधानसभा मतदार संघाच्या संभाव्य उमेदवार स्नेहल जगताप-कामत, राजिमस बँकेचे संचालक हनुमंत जगताप, अमित मोरे, तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदश्चंद्र पवार गटाचे कृष्णा करंजे, शेकापक्षाचे वैभव चांदे, काँग्रेसचे रघुनाथ वाडकर, संभाजी साळुंखे, सोमनाथ ओझर्डे, •› पान २ वर

## किहीममध्ये चिमुकल्यांच्या संशयास्पद मृत्यूने खळबळ

**। अलिबाग/सोगाव । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील किहीम आदिवासी वाडीमधील दोन बालकांचा झोपेतच मृत्यू झाल्याची घटना रविवारी (दि. ३१) सायंकाळी घडली. याप्रकरणी मांडवा सागरी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मात्र, या भावाबहिणीच्या मृत्यूबाबत संशय व्यक्त करण्यात आला आहे. दोघांच्या मृतदेहाचे मुंबई येथील जे.जे. रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून, त्यांचा विसेरा प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आल्याची माहिती समोर येत आहे.

आराध्या सदानंद पोळे (६ वर्षे) व सार्थक सदानंद पोले (३ वर्षे) अशी या दोन बालकांची नावे आहेत. दोघेही त्यांच्या घरात दुपारी जेवल्यानंतर झोपी गेले. सायंकाळचे सव्वासहा होत आले तरीही ते झोपेतून उठले नाही. •› पान २ वर



### शवविच्छेदन अहवालानंतरच सत्य समोर येणार

## रायगड लोकसभा निवडणुकीसाठी २०१४ ची पुनरावृत्ती

# शेकाप हाच विजयाचा कॉमन फॅक्टर

आविष्कार देसाई
**। रायगड ।**
अनंत गीते आणि सुनील तटकरेंचा आमना-सामना या आधी दोन वेळा झाला आहे. आता तिसऱ्यांदा लढण्यासाठी दोन्ही उमेदवार लोकसभेच्या आखाड्यात उतरले आहेत. २०१९ साली राष्ट्रवादीचे तटकरे विजयी झाले होते, तर २०१४ च्या निवडणुकीत मात्र शिवसेनेचे गीते यांनी तटकरेंना चारी मुंड्या चित केले होते. दोन्ही उमेदवारांच्या विजयामध्ये एक कॉमन फॅक्टर होता; तो म्हणजे शेकाप. आज शेकाप हा गीतेंच्या पाठीशी असल्याने तटकरेंना मतांची बेगमी करताना घाम फुटल्याचे चित्र आहे. •› पान २ वर

**२०१४ च्या निवडणुकीत**
गीतेंना तीन लाख ९६ हजार १७८ (३८.६३ टक्के), तर तटकरेंना तीन लाख ९४ हजार ६८ (३८.४३ टक्के) मते मिळाली होती.

**२०१९ च्या निवडणुकीत**
तटकरेंना चार लाख ८६ हजार ९६८ (४७.३९ टक्के), तर गीतेंना चार लाख ५५ हजार ५३० (४४.३३ टक्के) मते मिळाली होती.




- **२०१४ आणि २०१९ मध्ये शेकापचा हात ज्याच्या डोक्यावर होता, तो उमेदवार निवडून आला होता, हे काही आता लपलेले नाही. त्यामुळे गीते आणि तटकरेंच्या विजयामध्ये शेकाप हा विजयासाठीचा कॉमन फॅक्टर असल्याचे अधोरेखित होते.**
- **२०२४ ची निवडणूकही देश आणि देशाचे संविधान वाचवण्यासाठी आहे. देश आणि संविधान बुडवायला निघालेल्या भाजपाच्या गोटात तटकरे सामील झाल आहेत. त्यामुळे शेकापने गीतेंना विजयी करण्याचा चंग बांधला आहे. शेकाप गीतेंच्या बाजूने राहणार आहे, शिवाय भाजपाच्या विविध अन्यायकारक धोरणांवर नाराज असलेले मुस्लिम, दलित, ओबीसी हेदेखील इंडिया आघाडीच्या गीते यांच्याच बाजूने उभे राहिले आहेत. तसेच भाजपने या मतदारसंघावर हक्क सांगितला होता. मात्र, त्यांना तो मिळाला नसल्याने त्यांच्यामध्येदेखील नाराजी असल्याचे दिसते. त्यामुळे तटकरेंसाठी दिल्लीची वाट बिकट असल्याचे चित्र आहे.**

## भुजबळांच्या अडचणीत वाढ?

- **महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात पुनर्विचार याचिका**
- **अंजली दमानिया यांनी घेतली न्यायालयात धाव**

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
कथित महाराष्ट्र सदन घोटाळा प्रकरणात मूळ याचिकाकर्त्या अंजली दमानिया यांनी उच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल केली होती. यानंतर उच्च न्यायालयाने या प्रकरणी मंत्री छगन भुजबळ यांच्यासह इतर सर्व आरोपींना नोटीस जारी केली आहे. येत्या चार आठवड्यात यावर सुनावणी होणार आहे. त्यामुळे आता छगन भुजबळ यांच्या अडचणीत वाढ होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकीकडे छगन भुजबळ हे नाशिक लोकसभा मतदारसंघातून निवडणूक लढवण्याची तयारी करत असताना दुसरीकडे छगन भुजबळ यांना पुन्हा एकदा उच्च न्यायालयाकडून झटका बसला आहे.



कथित महाराष्ट्र सदन घोटाळ्यात ९ सप्टेंबर २०२१ ला भुजबळांना सत्र न्यायालयानं दोषमुक्त केलं. मात्र, या प्रकरणात जाणूनबुजून पुरावे दडपले गेल्याचा आरोप अंजली दमानियांचा होता. गेली दीड वर्ष अंजली दमानिया या निर्णयाला आव्हान देण्याच्या पाठपुरावा करत होत्या. मात्र ५ न्यायाधीशांनी 'नॉट बिफोर मी' सदर प्रकरण आमच्यासमोर नाही असं उत्तर दिल्याचं दमानियांनी म्हटलं. अखेर अंजली दमानियांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांनी संबंधित याचिका पटलावर घेण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाला दिले. त्यानंतर सोमवारी मुंबई उच्च न्यायालयानं येत्या चार आठवड्यात एसीबीसह निर्दोष ठरलेल्या भुजबळांनाही नोटीस पाठवली आहे. मात्र, संबंधित प्रकरण दुसऱ्या व्यक्तीबाबत असल्याचा दावा भुजबळांनी केला आहे.

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

२ एप्रिल

१)श्रीम. कांचनमाला अशोक बागडे चेंढरे, अलिबाग, दि.२/४/१९४८
२)श्री.दिलीपकुमार बाळकृष्ण देवळेकर ठिकरूळ नाका, अलिबाग दि.२/४/१९४९

# कठीण परिश्रमातून उभारले पत्रकार भवन

**रायगड (कुलाबा) जिल्ह्यात तेजस्वी पत्रकार म्हणून स्व. नारायण नागू पाटील व रामभाऊ मंडलीक यांनी पत्रकार क्षेत्रात उत्तुंग कामगिरी करुन जगाला निर्भिड पत्रकारिता काय असते हे सहउदाहरण दाखवून दिले होते. अशा उत्तुंग व्यक्तिमत्त्वाच्या नावाने जिल्ह्यात रामनारायण पत्रकार भवन उभारण्याचे अत्यंत कठीण काम हिमतीने व परिश्रमाने उभारले त्या जिल्हा पत्रकार संघाच्या अध्यक्षा रणरागिणी मीनाक्षी पाटील यांचे नाव पत्रकारितेच्या इतिहासात सुवर्ण अक्षराने नोंदले गेले आहे.**



त्या वेळच्या कुलाबा जिल्हा परिषदेचे अध्यक्ष प्रभाकर पाटील हे स्वतः पत्रकार असल्याने त्यांनी जिल्हा परिषदेच्या शिवतीर्थ या भव्य इमारतीत पत्रकारांसाठी सुसज्ज असे दालन दिले होते. यामुळे अलिबाग येथे येणाऱ्या पत्रकारांना त्याकाळी अशी सोय करणारे ते पहिले अध्यक्ष असावेत. त्या जिल्हा परिषदेत मीनाक्षी पाटील सहयोगी सदस्या होत्या. त्या अध्यक्षा असलेल्या पत्रकार संघात खजिनदार म्हणून काम करण्याची संधी मिळाली हे माझ्या आयुष्यात भाग्याची गोष्ट होती. १९८० सालापासून उपाध्यक्ष माधवराव मंडलिक, चिटणीस रामचंद्र पत्की, म.ना. पाटील, नागेश कुळकर्णी, नविनचंद्र सोष्टे, धनंजय गोंधळी, मदन हनुमंते, शहासने, अरुण कर्वे अशा या मंडळीबरोबर काम करताना त्याकाळी अत्यंत कठीण असलेल्या आर्थिक बाजूत मीनाक्षी पाटील यांनी केलेले काम पुन्हा होणे नाही. त्या राजकारणी, समाजकारणी जरुर होत्या; परंतु पत्रकार क्षेत्रात त्यांचे काम, त्यांनी केलेला त्याग आजच्या पत्रकार मंडळींना समजणे कठीण आहे. समर्पण व त्याग याच्या त्या ज्वलंत मूर्तीमंत उदाहरण होत्या. उपेक्षितांना न्याय देण्याच्या बाबतीत संपूर्ण जिल्ह्यात जाऊन पत्रकार संघाची ध्वजा फडकवणाऱ्या त्या एकमेव अध्यक्षा होत्या. त्याचे उदाहरण म्हणजे, पनवेल तालुक्यातील बंबावी कोळीवाडा या दुर्लक्षित गावात कोणीही राजकीय पुढारी कधीच गेला नाही. मात्र, जिल्हा परिषद अध्यक्ष प्रभाकर पाटील व मिनाक्षी पाटील यांनी भर पावसात गावात जावून गावासाठी रस्ता, पाणी, शाळा देण्याचे व पूर्ण करुन घेण्याचे काम केल्यानंतर राजकीय पुढाऱ्यांना गाव माहीत पडले हे विशेष. अशा थोर व्यक्तिमत्त्वाला अखेरचा लाल सलाम.

**माधव पाटील**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**



**निरज विद्याधर पैठणकर, वाढदिवस, थळ बाजार, अलिबाग**

# महाराष्ट्रातील आणखी एक कुटुंब फुटणार?

**। बीड । प्रतिनिधी ।**

राज्यात लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अनेक राजकीय घडामोडींना वेग आला आहे. राष्ट्रवादीत झालेल्या बंडखोरीनंतर पवार कुटुंबात शरद पवार विरुद्ध अजित पवार असा वाद पाहायला मिळत आहे. अशात आता राज्यातील अनेक एका राजकीय कुटुंबात फूट पडण्याची शक्यता आहे. कारण, एकीकडे शिवसंग्राम पक्षाच्या राष्ट्रीय अध्यक्ष ज्योती मेटे यांची राष्ट्रवादी काँग्रेससोबत बोलणी सुरू असताना, दुसरीकडे विनायक मेटे यांच्या लहान भावाची संघटना महायुतीत सहभागी होण्याची शक्यता आहे.

विनायक मेटे यांच्या निधनानंतर त्यांचे लहान भाऊ रामहरी मेटे यांच्याकडून जय शिवसंग्राम नावाची संघटना स्थापन करण्यात आली होती. आता एकजण महाविकास आघाडीसोबत आणि दुसरे महायुतीसोबत जाण्याची शक्यता आहे.



सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पुढील दोन-तीन दिवसांत जय शिवसंग्राम ही संघटना महायुतीमध्ये सहभागी होण्याची शक्यता आहे. विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांचादेखील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील सहभागासंदर्भातला निर्णय ४८ तासांत होण्याची शक्यता आहे. असे झाल्यास बीड जिल्ह्यात मेटे विरुद्ध मेटे असाही वाद पाहायला मिळण्याची शक्यता आहे.

बीड लोकसभा मतदारसंघातून भाजपने पंकजा मुंडे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. तर, दुसरीकडे शरद पवार गटाकडून ज्योती मेटे यांना उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. असे झाल्यास विनायक मेटे यांचा मराठा समाजासाठी केलेला लढा पाहता ज्योती मेटे यांना मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर फायदा होऊ शकते. तसेच, विनायक मेटे यांच्या निधनानंतर ज्योती मेटे यांना सहानुभूतीदेखील मिळण्याची शक्यता आहे. त्यामुळे मेटे कुटुंबातील सदस्य आपल्या बाजूने करून महायुतीने 'मास्टर स्ट्रोक' मारण्याचा प्रयत्न केला असल्याची चर्चा आहे. त्यामुळे रामहरी मेटे नेमका काय निर्णय घेणार हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

**मुंडे बहीण-भाऊ एकत्र**

**मागील काही वर्षात धनंजय मुंडे विरुद्ध पंकजा मुंडे असा वाद पाहायला मिळत होते. दोन्ही नेत्यांकडून एकमेकांवर टीकाही करण्यात आल्याचे पाहायला मिळाले. असे असताना अजित पवारांची राष्ट्रवादी भाजपसोबत सत्तेत सहभागी झाल्याने मुंडे बहीण-भाऊदेखील एकत्रित आले. आता लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर स्वतः धनंजय मुंडे हे बहिणीच्या प्रचारासाठी मैदानात उतरले असल्याचे पाहायला मिळत आहे. तर, पंकजा मुंडे, प्रीतम मुंडे आणि धनंजय मुंडे दोघेही एकत्रित प्रचार करतानादेखील पाहायला मिळत आहे.**

# सचिन घाडींचा वृद्धाश्रमात वाढदिवस साजरा



**। सोगाव । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील मूनवली येथील सामाजिक कार्यकर्ते सचिन घाडी यांनी शनिवार, दि. ३० मार्च रोजी आपला ४३ वा वाढदिवस आगळ्या वेगळ्या पध्दतीने व सामाजिक भान ठेवून परहूर येथील श्री समर्थ वृद्धाश्रम येथे वृद्धांचे आशीर्वाद घेत केक कापून साजरा केला.

यावेळी वृद्धाश्रमाचे संचालक जयेंद्र गुंजाळ यांना सचिन घाडी यांनी आर्थिक मदतीचा धनादेश दिला. वृद्धाश्रमात वाढदिवस साजरा करताना सचिन घाडी यांच्यासोबत त्यांच्या घरातील सर्व सदस्य, सचिन घाडी मित्रमंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## साताऱ्यातून लढायला तयार : पृथ्वीराज चव्हाण

**मुंबई :** शरद पवार यांनी आदेश दिल्यास मी साताऱ्यातून लढायला तयार आहे. याबाबतचा अंतिम निर्णय पवार यांनाच घ्यायचा आहे, अशी भूमिका पृथ्वीराज चव्हाण यांनी साताऱ्यात मांडली आहे. सातारा लोकसभा मतदारसंघ हा राष्ट्रवादी काँग्रेसचा बालेकिल्ला मानला जातो. या मतदारसंघात सर्वात सक्षम उमेदवार कोण, हे शोधण्याचं काम सुरू आहे. माझं नाव काही लोकांनी आणि माध्यमांनी चर्चेत आणलं आहे. सातारा मतदारसंघात उमेदवार कोण असावा याबद्दल चर्चा सुरू आहे, मात्र हा मतदारसंघ राष्ट्रवादीचाच आहे, माझी जयंत पाटील यांच्याबरोबर चर्चा झाली. उमेदवाराचा निर्णय शरद पवार यांनी घ्यायचा आहे. शरद पवार जो उमेदवार देणार त्यामागे आम्ही पूर्ण ताकदीने मागे उभे राहू, असं सांगितलं आहे. सातारा लोकसभा काँग्रेसने लढवावी म्हणून प्रस्ताव अजून आला नाही, जर आला तर विचार करू, असेही पृथ्वीराज चव्हाण यांनी सांगितले.

## नालेसफाईचा मुहूर्त कधी?



**■ पनवेलच्या पटेल मोहल्यातील नाल्याची भयाण अवस्था झाली असून, प्लास्टिक पिशव्यांचा तर खच पडला आहे. या नाल्याची सफाई का होत नाही, असा प्रश्न रहिवाशांना पडला आहे. (छायाचित्र : राजेश डांगळे)**

# शारलोट तलावाची पातळी खालावली

## ■ माथेरानकरांना करावा लागणार पाणीटंचाईचा सामना

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

माथेरानला पाणीपुरवठा करणाऱ्या शारलोट लेक तलावाची पातळी मार्च महिन्यात खालावली असून, ऐन एप्रिल-मे महिन्यात माथेरानला भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

शारलोट लेक तलाव ब्रिटिश काळापासून अस्तित्वात असून, सुमारे शंभर वर्षाहून अधिक काळ माथेरानची तहान भागविण्याचे काम हा तलाव करत आहे. सध्या हा तलाव महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यात असून, त्याची संपूर्ण देखभाल करण्याची जबाबदारी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची आहे, असे असले तरी गेल्या अनेक वर्षांपासून तलाव साफ केला नसल्याने तलावात मोठ्या प्रमाणात गाळ जमा झाला आहे



सध्या तलावात ४० टक्के पाणी असून, त्यात पंचवीस टक्के गाळ आहे हा तलाव गाळमुक्त होण्याकरिता तत्कालीन मनसेचे अध्यक्ष संतोष कदम यांनी उपोषणदेखील केले, तर ठाकरे गटाचे प्रसाद सावंत यांनी जीवन प्राधिकरणाला पत्र व्यवहारदेखील केला, तर नगरसेवक असताना तलाव साफ करण्यासाठी ६६ लाखांची तरतूददेखील केली पण जीवन प्राधिकरणाचा उदासीन धोरणामुळे गाळ साफ होऊ शकला नाही, असे सावंत म्हणाले.

माथेरान शहरला पाणी पुरवठा करणाऱ्या शारलोट तलाव क्षमता कमी पडत असल्याने माथेरान १९८४ साली माथेरान नवीन नळ पाणी योजना आली. काही दिवस सुरळीत सुरू असलेली ही योजना ४० वर्षांनंतर योग्य देखभाल नसल्याने कुचकामी ठरली आहे. सध्या माथेरान अंतर्गत पाईप लाईन बदली केली असून, काही प्रमाणात नागरिकांचा त्रास दूर झाला; परंतु घाटातील पाईप लाईन फुटत असल्याने तिचा थेट परिणाम माथेरानच्या पाणीपुरवठा योजनेवर होत आहे.

> **माथेरानमधील प्रतिष्ठित ग्राहकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे. ती भरुन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.**
> **- के.बी. पाटील, कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण**

**पान १ वरून**

## तटकरे पितापुत्र हपापलेले

दिवेकर यांनी केला आहे. गेल्या पाच वर्षांत स्वतः खासदारांची कन्या आदिती तटकरे जिल्ह्याच्या पालकमंत्री, कॅबिनेट मंत्री आहेत, त्यांनी आतापर्यंत खारेपाटातील पाणीप्रश्न सोडवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न केला का, याचे उत्तर खासदारांकडे आहेत का? पाणीप्रश्न सोडाच, खासदारसाहेबांनी गेल्या पाच वर्षांत किती वेळा जनतेच्या भेटीगाठी घेतल्या, याचे उत्तर तरी त्यांच्याकडे आहे का, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.

## शिवाजी पार्कसाठी जोरदार रस्सीखेच

प्रशासनासमोर मोठा पेच निर्माण झाला आहे. याचा फैसला इनवर्ड नंबरवरून केला जाणार आहे. १७ मे रोजी शिवाजी पार्क मैदान मिळावं, यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने प्रथम अर्ज केला असल्याचं बीएमसीने दिलेल्या इनवर्ड नंबरवरून दिसत आहे. यामुळे नियमानुसार शिवाजी पार्क मैदान महाराष्ट्र नवनिर्माण सेनेलाच मिळणार असल्याचा विश्वास मनसेच्या नेत्यांनी व्यक्त केला आहे. शिवाजी पार्क मैदान वर्षातील ३९ विशिष्ट दिवस सोडून अन्य दिवशी जाहीर सभांसाठी देण्यात येत असते.

शिवाजी पार्कसाठी दोन पक्षांमधीस संघर्ष नवा नाही. याआधी २००९ च्या लोकसभा निवडणुकीतही अशाच प्रकार शिवसेना व मनसेमध्ये चढाओढ लागली होती. दोन्ही पक्षांनी यासाठी अर्ज केले होते. मात्र त्यावेळीही मनसेने पहिल्यांदा अर्ज केल्याने सभेसाठी त्यांना मैदान दिले होते. आता १७ मे रोजी शिवाजी पार्कवर उद्धव ठाकरेंचा आवाज घुमणार की, राज ठाकरेंची तोफ धडाडणार, याची उत्सुकता आहे.

## शेकाप हाच विजयाचा कॉमन फॅक्टर

२००९ साली देशातील सर्वच लोकसभा मतदारसंघांची पुनर्रचना झाली होती. त्यामध्ये कुलाबा मतदारसंघ संपुष्टात येऊन रायगड लोकसभा मतदारसंघ अस्तित्वात आला होता. त्यावेळी काँग्रेसकडून बॅ. ए.आर. अंतुले व गीत निवडणुकीच्या रिंगणात उतरले होते. यामध्ये शिवसेनेच्या गीते यांना चार लाख १३ हजार ५४६ (५३.८ टक्के) तर, अंतुले यांना दोन लाख ६७ हजार २५ (३४.७ टक्के) मते मिळाली होती. या लढतीमध्ये गीते मोठ्या फरकाने विजयी झाले होते.

खासदारकीचा गीतेंना प्रदीर्घ अनुभव असल्याने २०१४ च्या निवडणुकीत तटकरे अगदीच नवखे होते. दोन्ही उमेदवारांनी प्रचारामध्ये कोणतीच कसर सोडली नव्हती. जिल्ह्यात जातीचा फॅक्टर महत्त्वाचा ठरतो. त्यानुसारदेखील रणनीती आखण्यात आली होती. परंतु, याउपरही गीतेंचे शेकाप हे बलस्थान होते. शेकापच्या मतदारांना आमदार जयंत पाटील यांनी एकनिष्ठ ठेवले आहे. मतदारांचा आमदार पाटील यांच्यावर विश्वास आहे. त्यामुळेच गीतेंना निवडणुकीत विजय मिळविणे सोपे झाले. पुढे २०१९ च्या निवडणुकीत तटकरे हे आमदार पाटील यांच्या जवळ आले होते. जिल्हा परिषदेमध्येही शेकाप-राष्ट्रवादी काँग्रेस अशी युती होती. त्यामुळे या कालावधीत बहुतांश निवडणुका त्यांनी युतीमध्ये लढल्या होत्या. त्यामुळे २०१९ साठी तटकरेंना आमदार पाटील यांनी पाठिंबा दिला आणि त्यांना निवडूनदेखील आणले होते.

## उद्धव ठाकरेंकडून पाटील कुटुंबियांचे सांत्वन

जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, प्रशांत मिसाळ, किशोर जैन, पिंट्या उर्फ अमिर ठाकूर, हेमंत पाटील, दर्शना पाटील, अविनाश पाटील, चंद्रहास पाटील, नरेश म्हात्रे, तालुका प्रमुख शंकर गुरव, कैलास गजने, उपतालुका प्रमुख प्रकाश पाटील, विष्णू पाटील आदी मान्यवर पदधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, माजी सदस्या भावना पाटील, शैला पाटील, नृपाल पाटील, सवाई पाटील, सुमना पाटील, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती अनिल पाटील, सुरेश खोत, दीपक पाटील आदी शेकापचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भाजपरूपी बकासुराच्या वधासाठी भीमरूपी जनता सज्ज

धनंजय देशमुख, स्वीटी गिरासे, जनार्दन मानकर तसेच महाविकास आघाडीचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. अनंत गीते यांनी पुढे बोलताना, महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मतदान करण्यात महिला आघाडीचा वाटा वाघिणीचा असावा अशी अपेक्षा व्यक्त करताना ५२ टक्के महिला मतदार आहेत. महिला मशालीसारख्या धगधगत्या असल्या तर घरातील सर्वांचे मतदान मशालीच्या चिन्हावर होईल. दोन लाखांपेक्षा अधिक मताधिक्य इंडिया आघाडीच्या माध्यमातून घेऊन विजयी होणार असल्याचा दावा गीतेंनी यावेळी केला.

यावेळी व्यासपीठावर जिल्हाप्रमुख अनिल नवगणे, महाड विधानसभा मतदारसंघाच्या संभाव्य उमेदवार स्नेहल जगताप-कामत, संपर्कप्रमुख संजय मानाजी कदम, जिल्हा उपसंघटक बाळ राऊळ, अजय सलागरे, धनंजय देशमुख, राजिमस बँकेचे संचालक हनुमंत जगताप, तालुकाप्रमुख अनिल मालुसरे, शेकापक्षाचे वैभव चांदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदश्चंद्र पवार गटाचे कृष्णा करंजे, बाळ राऊळ, स्वीटी गिरासे, अमित मोरे, पद्माकर मोरे, सुरेंद्र चव्हाण आदी पदाधिकारी उपस्थित होते.

अनंत गीते म्हणाले की, ज्यांनी निष्ठेला कलंक लावून गद्दारी केली; त्यांना धडा शिकविण्यासाठी निवडणूक लढायची आणि जिंकायची आहे. महाराष्ट्रात ५९ टक्क्यांची इंडिया आघाडी एकत्र होईल तेव्हा भाजपसोबतची एनडीए आघाडी देशातून राज्यातून हद्दपार होईल. अनंत गीतेच्या चारित्र्यावर डाग लागला नाही आणि यापुढेही लागणार नाही. स्नेहलसाठी रेड कार्पेट अंथरून त्यावरून स्नेहल जगताप कामत यांना विधानसभेत पाठवणार, असा दृढनिर्धार यावेळी अनंत गीते यांनी व्यक्त केला.

## किहीमध्ये चिमुकल्यांच्या संशयास्पद मृत्यूने खळबळ

त्यामुळे त्यांच्या आईने त्यांना आवाज देण्याचा प्रयत्न केला. मात्र, कोणतीही हालचाल दिसून आली नाही. याबाबतची खबर सरपंच पिंट्या गायकवाड यांना मिळाली असता, त्यांनी दोन्ही मुलांना आपल्या रुग्णवाहिकेतून बेशुद्ध अवस्थेत उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात आणले. मात्र, तेथील डॉक्टरांनी तपासून ते मयत असल्याचे सांगितले.

या बालकांच्या मृत्यूबाबत संशय निर्माण झाल्याने सहाय्यक पोलीस निरीक्षक सोमनाथ लांडे यांनी मुंबई येथील सर जे.जे. रुग्णालयात त्यांचे मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविले. सोमवार, दि. १ एप्रिल रोजी शवविच्छेदन करून मृतदेह पालकांच्या ताब्यात दिले. या मुलांच्या पार्थिवावर अंतिम विधी करण्यासाठी त्यांचे नातेवाईक त्यांच्या मूळगावी पुसद-यवतमाळ येथे घेऊन गेले आहेत. या बालकांच्या मृत्यूमुळे संशय निर्माण झाल्याने त्यांचा विसेरा आणि शवविच्छेदनाचा अंतिम अहवाल आल्यानंतर सर्व गोष्टी स्पष्ट होणार आहेत.

## धनंजय म्हात्रेला एक वर्षाची शिक्षा

**। पेण । प्रतिनिधी ।**



पेण-रोडे येथील महिलेच्या मनात लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य केल्याप्रकरणी आरोपी धनंजय म्हात्रे याला एक वर्षाची शिक्षा आणि तीन हजार रुपये दंड ठोठावण्यात आला आहे. गेली सहा वर्षे पेण न्यायालयात हा खटला चालू होता. अखेर ३० मार्च रोजी आरोपी धनंजय म्हात्रे, रा. रोडे, पेण यास न्यायाधीश आर.एन. मुजावर यांनी एक वर्षाची शिक्षा आणि तीन हजार रूपये दंडाची शिक्षा सुनावली. या खटल्यामध्ये विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता एस.वाय. नाईक व दिनेश पाटील यांनी काम पाहिले.

# न्यायालयाचा मुस्लिम पक्षाला मोठा झटका

## ■ व्यास तहखान्यात पूजा सुरूच राहणार

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ज्ञानवापी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने मुस्लिम पक्षाला मोठा झटका दिला आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्या निर्णयावर स्थगिती आणण्यास नकार दिला आहे, ज्यामध्ये अलाहाबाद हायकोर्टाने वाराणसी जिल्हा कोर्टाचा निर्णय कायम ठेवण्याचा निर्णय दिला होता. वाराणसी कोर्टाने ज्ञानवापी मशिदीच्या आता व्यास तहखान्यामध्ये पूजा करण्याची परवानगी दिली होती.



सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की, १७ जानेवारी आणि ३१ जानेवारी (तहखान्याच्या आत पूजा करण्याची परवानगी) च्या आदेशानंतर मुस्लिम समुदायाकडून मशिदीत कुठल्याही अडचणीशिवाय नमाज अदा केली जात आहे आणि हिंदू पुजाऱ्यांकडून पूजा केली जात आहे. तहखाना परिसरात यथास्थिती ठेवणे योग्य आहे जेणेकरून दोन्ही समुदाय निश्चित करण्यात आलेल्या अटींनुसार पूजा करू शकतील. याप्रकरणी फेब्रुवारीमध्ये अलाहाबाद हायकोर्टाने सुनावणी करत मुस्लिम पक्षाची याचिका फेटाळून लावली होती.

यामध्ये हिंदू पक्षाला पूजा करण्याचा अधिकार देणारा जिल्हा कोर्टाच्या आदेशाला आव्हान देण्यात आले होते. अलाहाबाद हायकोर्टाच्या या निर्णयानंतरदेखील मुस्लिम पक्षाला झटका बसला होता आणि त्यानंतर मुस्लिम पक्षाने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती.

# ॲड. जीविता पाटील यांना भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्कार

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

लेक लाडकी अभियान अंतर्गत आयोजित कार्यक्रमांमध्ये पत्रकार भवन मुंबई येथे सामाजिक कार्यकर्ती, विधीज्ञ तसेच तेजस्विनी फाऊंडेशन रायगड संस्थापिका ॲड. जीविता सूरज पाटील यांना हजारोंच्या उपस्थितीत मराठी पत्रकार भवन मुंबई येथे महापौर मुंबई महानगरपालिका किशोरीताई पेडणेकर यांच्या हस्ते भारत गौरव राष्ट्र प्रेरणा पुरस्कार २०२४ सन्मानपूर्वक प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी समारंभ अध्यक्षा चारुशीला देशमुख, संस्थापक अध्यक्ष शिवाजीराव देशमुख, सामाजिक व शैक्षणिक संस्था स्वागताध्यक्ष डॉ. मोनिका चोप्रा-जगताप, प्रमुख पाहुणे स्वाती घोसाळकर, स्वाती ओक तसेच लेक लाडकी अभियान संयोजक मुंबई सूरज भोईर इत्यादी



मान्यवर मंडळी उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ती जीविता पाटील यांनी आयुष्यभर स्वावलंबी जीवन जगत असताना अंगणवाडी सेविका म्हणून काम करीत असताना परिस्थितीशी तडजोड करून आपले शिक्षण पूर्ण केले. समाजातील वेगवेगळ्या सामाजिक संस्थांचे पदभार सांभाळले. महिलांविषयी असणाऱ्या शासकीय निमशासकीय कमिटी सदस्या, प्रमुख वक्ता, निवेदक, परीक्षक, मार्गदर्शक, पत्रकार इ. अनेक भूमिका पार पाडून आपला व मुलाचा उदरनिर्वाह करून समाजात आपला एक मानाचा ठसा उमटविला आहे.

स्वतः खडतर परिस्थितीत शिक्षण घेवून आज त्या कित्येक महिलांना शिक्षणासाठी प्रोत्साहित करीत आहेत. त्यांनी स्वतः एम.ए. बी.एड, एम. ए.एज्युकेशन, एम.एस.डब्ल्यु, एल.एल.बी.पर्यंत शिक्षण पूर्ण केले असून सध्या त्या एल.एल.एम. हे मास्टर डिग्री अभ्यासक्रम बी.सी.टी. कॉलेज ऑफ लॉ पनवेल येथे प्राचार्या सानवी देशमुख, सहाय्यक प्रोफेसर धनश्री कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करीत आहेत.

आत्तापर्यंत त्यांनी ४९ मुली दत्तक घेऊन त्यांचे शिक्षण पूर्ण केले आहे. अलिबागमध्ये राहूनच एक सुसज्ज वृध्दाश्रम आणि महिलांसाठी रोजगार केंद्र स्थापन करण्याचा त्यांचा मानस आहे. त्या करीत असणाऱ्या कार्याचा गौरव म्हणूनच त्यांना मुंबई मराठी पत्रकार भवन येथे लेक लाडकी अभियान अंतर्गत भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्कार २०२४ प्रदान करून सन्मानित करण्यात आले आहे.





# पाटील कुटुंबियांचे मान्यवरांकडून सांत्वन

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगडच्या रणरागिणी, माजी राज्यमंत्री, शेतकरी कामगार पक्षाच्या झुंजार, लढवय्या, अभ्यासू व्यक्तिमत्त्व मीनाक्षी पाटील यांचे शुक्रवारी (दि.२९) निधन झाले. निधनाची वार्ता कळताच राजकीय, सामाजिक, शैक्षणिक आदी विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांकडून पाटील कुटुंबियांचे सोमवारी (दि.१) पेझारी येथे येऊन पाटील कुटुंबियांची सांत्वनपर भेट घेतली.



यावेळी खासदार अरविंद सावंत, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेंद्र थोरवे, हितेंद्र ठाकूर, हरिश्चंद्र ठाकूर, सदाभाऊ कदम आदी वेगवेगळ्या पक्षातील दिग्गज मान्यवर मंडळी तसेच ज्येष्ठ पत्रकार एस. एम. देशमुख यांनी पेझारी येथे यांच्या घरी येऊन पाटील कुटूंबियांची भेट घेतली.

यावेळी जिल्हा परिषद माजी अध्यक्षा सुप्रिया पाटील, जिल्हा परिषद माजी अर्थ सभापती चित्रा पाटील, जिल्हा परिषद माजी सदस्या भावना पाटील, रायगड बाजारचे चेअरमन नृपाल पाटील, शेकाप महिला आघाडी प्रमुख चित्रलेखा पाटील, युवा नेते सवाई पाटील, आंबेपूरच्या सरपंच सुमना पाटील आदी पाटील कुटूंबिय व कार्यकर्ते उपस्थित होते.

## माजी राज्यमंत्री मीनाक्षी पाटील यांना
# पीएनपी शाळा, महाविद्यालयांत वाहिली श्रद्धांजली



**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

पीएनपी एज्युकेशन सोसायटीच्या उपाध्यक्ष, माजी राज्यमंत्री, शेतकरी कामगार पक्षाच्या झुंजार, लढवय्या, अभ्यासू व्यक्तिमत्त्व आणि भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या रायगडची मुलुख मैदानी तोफ म्हणून ज्यांचा गौरव केला जायचा अशा माजी राज्यमंत्री, आमदार मीनाक्षीताई पाटील यांचे शुक्रवारी (दि. २९) देहावसान झाले.

रायगड जिल्ह्यात शिक्षण क्षेत्रात पाटील कुटुंबियांचे मोठे योगदान आहे, लोकनेते अँड. दत्ता पाटील, रायगडचे भाग्यविधाते प्रभाकर पाटील, आमदार जयंत पाटील, मीनाक्षी पाटील यांच्या प्रयत्नाने रायगडमध्ये खेडोपाड्यात शिक्षणाची गंगा आणली त्याच प्रमाणे मीनाक्षी पाटील यांचा प्रगल्भ अभ्यास, रोखठोक भूमिका, झुंजार नेतृत्वाच्या जोरावर त्यांनी महाराष्ट्राच्या राजकारणात पाटील कुटुंबाचे नाव उंचावले. वयाच्या ७६ व्या वर्षी शुक्रवारी अखेरचा श्वास घेतला आणि महाराष्ट्र एका कर्तृत्ववान व्यक्तिमत्वाला मुकला.

एक खंबीर नेतृत्व व अभ्यासू व्यक्तिमत्त्व असणाऱ्या मीनाक्षीताई पाटील यांना पीएनपी एज्युकेशन सोसायटीचे मुख्य कार्यालय, जिल्ह्यातील सर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्चमाध्यमिक, इंग्रजी माध्यमाच्या शाळा, कनिष्ठ व वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये शनिवारी सर्व शाळांचे मुख्याध्यापक, महाविद्यालयांचे प्राचार्य, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी मीनाक्षीताई पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांनी केलेल्या आजवरचे कार्य आणि आठवणींना उजाळा देऊन आदरांजली वाहिली.

# गांजा विक्री करणाऱ्यास अटक

**। रसायनी । वार्ताहर ।**

वाशिवली गावाच्या हद्दीत पारनेरकर महाविद्यालयाच्या मैदानाच्या बाजूला गांजा विक्री करणाऱ्या ज्ञानेश्वर बालाजी जाधव (वय ७५, वाशिवली, खालापूर) याला रसायनी पोलिसांनी रंगेहाथ पकडले. त्याच्याकडून १४ हजार ५४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत वाशिवली गावात एकजण गांजा विक्री करीत असल्याची माहिती पोलिसांना बातमीदारामार्फत मिळाली होती. मिळालेल्या माहितीच्या आधारे, सापळा रचत ज्ञानेश्वर जाधव याला महाविद्यालयाच्या मैदानाचे बाजूला मोहाच्या झाडाखाली गांजा विकताना रंगेहाथ पकडले. ज्ञानेश्वरची झडती घेतली असता त्याच्याकडे एक किलो ८५ ग्रॅम गांजा व रोख तीन हजार ५४० रु. सापडले. ज्ञानेश्वर जाधव याला अटक करण्यात आली असून त्याच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# घनकचरा प्रकल्पाला आग

**। नेरळ । वार्ताहर ।**

**नेरळ शहराच्या कचरा व्यवस्थापनासाठी असलेला घनकचरा प्रकल्पासमोर रविवारी (दि.३१) आग लागली. या आगीच्या धुरांचे प्रचंड लोळ उठल्याने परिसरातील नागरिकांना श्वास घेण्यासही त्रास होत होता. त्यामुळे कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले यांनी जिल्हा परिषदसह प्रशासनाला याबाबत सूचित करून पुढील मोठी हानी रोखली. घनकचरा प्रकल्पासमोरच आग लागल्याने या प्रकाराबाबत विरले यांनी नाराजी व्यक्त केली आहे.**



**परिसरात धुरांचे प्रचंड लोट, नागरिकांना श्वास घेण्यास त्रास**

> **आम्ही तात्काळ त्या ठिकाणी पोहचून प्रशासनाला फोन करून याबाबत माहिती कळवली. पाण्याचे टँकर बोलावून आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्यासोबत याबाबत आम्ही कायमचा मार्ग काढण्यासाठी चर्चा करणार आहोत.**
> **–महेश विरले, सरपंच कोल्हारे ग्रामपंचायत**

तालुक्यातील नेरळ शहरात कचऱ्याच्या समस्येतून मार्ग काढण्यासाठी घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पाची निर्मिती करण्यात आली होती. मात्र हा प्रकल्पच आता नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत आहे. या प्रकल्पाच्या समोरच कचऱ्याचे मोठे ढीग साठले असल्याने परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असतो. हेही कमी म्हणून रविवार दिनांक ३१ मार्च रोजी या कचऱ्याच्या ढिगाला आग लागली. दुपारी साधारण साडेबारा लागलेली हि आग चांगलीच भडकली. त्यामुळे उमा नगर, साई मंदिर, स्टेशन परिसर, पेशवाई मार्ग पासून ते थेट धामोते भागात दूरचे लोट पोहचले असल्याने नागरिकांना श्वास घेणे देखील जिकरीचे झाले. त्यामुळे या भागातील नागरिकांनी कोल्हारे ग्रामपंचायत सरपंच महेश विरले यांना फोन करून यावर उपाययोजना करण्याची विनंती केली. तेव्हा महेश विरले यांनी तात्काळ या आग लागलेल्या भागाला भेट देऊन अग्निशमन दल, नेरळ ग्रामपंचायत यांना याबाबत माहिती देऊन आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. यावेळी त्यांचे सहकारी रोशन म्हसकर, पपेश विरले थांबून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. तर याबाबत समजताच नेरळ ग्रामपंचायतचे ग्रामसेवक अरुण कारले, कर्मचारी मंगेश ईरमाले, कृष्णा पारधी यांनी आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. तसेच याठिकाणी दोन गायी बांधून ठेवण्यात आल्या होत्या. त्यांच्या बाजूला आगीची झळ पोहचू नये म्हणून संदेश साळुंके यांनी त्या गायींना दुसऱ्या ठिकाणी नेऊन बांधले.

> **घनकचरा प्रकल्पासमोर कचऱ्याचा ढीग असून त्याला रविवारी आग लागली. आग आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, आग धुमसत असल्याने धुराचे प्रचंड लोळ होते. यामुळे नागरिकांना त्रास झाला असल्याने घनकचरा प्रकल्पाच्या ठेकेदाराला नोटीस देण्याची कारवाई करत आहोत.**
> **–अरुण कारले, ग्रामसेवक नेरळ ग्रामपंचायत**

दरम्यान, काही महिन्यांपूर्वी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. भरत बास्टेवाड यांनी या प्रकल्पाला भेट देऊन वाहवा केली होती. मात्र प्रत्यक्षात याठिकाणी रायगड जिल्हा परिषदेने सुमारे पाऊणे दोन कोटी रुपये खर्च करून हा प्रकल्प ठेकेदाराला आंदण दिला आहे. तेव्हा आता आगीने पितळ उघड पडलेल्या या प्रकल्पाच्या ठेकेदारावर कारवाई करण्याची हिम्मत जिल्हा परिषद व नेरळ ग्रामपंचायत दाखवेल का हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

# जिते येथे कांद्याची यशस्वी शेती

**। नेरळ । प्रतिनिधी ।**



कर्जत तालुक्यातील जिते गावातील शेतकरी अंकुश हरीचंद जाधव यांनी लाल कांद्याची यशस्वी शेती केली आहे. अवघ्या १०० रुपयांच्या बियाण्यापासून तब्बल दोन टन कांद्याचे पीक घेतले आहे. कांद्याच्या यशस्वी शेती बद्दल जाधव यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

जाधव यांची शेती नेरळ कशेळे रस्त्याच्या बाजूला आहे. त्या शेत जमिनीपासून काही अंतरावरून उल्हास नदी वाहत असल्याने जिते गावातील अनेक शेतकरी हे उन्हाळयात वेगवेगळ्या प्रकारची शेती करतात.त्यात अंकुश जाधव यांनी कांद्याचे पीक घेण्याचा प्रयत्न केला आहे. फुरसुंगी जातीचे वाण जाधव यांनी नेरळ गावातील रामदास तुपे यांच्या प्रचिती ॲग्रो मधून फक्त १०० रुपयांचे बियाणे आणले. त्या बियाणे मधून आपल्या शेतातील दहा गुंठे जमिनीवर कांद्याची लागवड केली. शेतात वाफे तयार करून त्यावर कांद्याचे बियाणे यांची टोकरणी केली. उल्हास नदीमधून पाणी उचलून त्या भागातील शेतकरी हे शेती करतात. त्याप्रमाणे अगदी अल्प प्रमाणात पाण्याची गरज असलेल्या कांद्याच्या शेतीला पाणी देण्याचे नियोजन केले.

कांद्याच्या शेतीचा कोणत्याही प्रकारचे अभ्यास नसताना देखील प्रचिती ॲग्रो आणि केवळ स्थानिक कृषी अधिकारी यांचे मार्गदर्शन घेवून लाल कांद्याची शेती केली. अवगत १०० रुपयांचे बियाणे यापासून जाधव यांनी दहा गुंठे जमिनीतून तब्बल दोन टन म्हणजे २०० किलो कांदा शेतातून मिळाला आहे.जाधव यांनी हा सर्व कांदा आपल्या घराच्यासाठी साठवून ठेवण्याचा निर्णय घेतला असून पाणी आणि खताचे नियोजन यावर लाल कांद्याचे यशस्वी उत्पादन घेतले आहे.

# अभयारण्यात पाण्यासाठी विविध उपाययोजना

**। पनवेल । वार्ताहर ।**

उन्हाळ्याची चाहूल लागल्यावर मुंबई-गोवा महामार्गावरील कर्नाळा पक्ष अभयारण्यातील पाणी काही प्रमाणात आटल्याने अरण्यातील पक्षी तहानलेले असून गेल्या वर्षी बांधण्यात आलेल्या नवीन जाळीच्या बंधाऱ्यात काही प्रमाणातच पाणी शिल्लक असून मे महिन्यात तीव्र पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.




- **पक्ष्यांसाठी तीन तलाव**
- **मे महिन्यात पाणी टंचाई**

पनवेल शहरापासून १२ किमी अंतरावर अतिशय सुंदर रमणीय व विविध प्रकारच्या वृक्षवेलींनी व पक्ष्यांनी समृध्द असे कर्नाळा अभयारण्य आहे. मुंबईपासून काही तासाच्या अंतरावर असलेल्या निसर्गरम्य ठिकाणी वर्षभर मोठ्या प्रमाणात पर्यटक येतात. लोणावळयाप्रमाणे कर्नाळा उंचावर असल्याने येथील हवाही नेहमी थंड असते. निसर्ग, हवेतील गारवा आणि शांतता यांचा संगम असलेल्या या अभयारण्यात दोन प्रकारची वने आहेत. याशिवाय, रानखाटीक, ठिपकेवाला सातभाई, कस्तुर, शिंपी, गिधाड, मुनिया, नाचन, सुगरण, बया, सुरेल, खाचू कवटा, राखी धोबी, कर्नाळा पक्षी अभयारण्य भारतव्दाज, शामा, मोर, फुलटोचा, पावशा, बहिरा, कापशी घार, नीळकंठ, पोपट, सुर्यपक्षी, हरियल यासारखे सुमारे १३४ प्रजातीचे स्थानिक तर ३८ प्रजातीचे स्थलांतरीय पक्षी कर्नाळा अभयारण्यात आढळतात. दरम्यान, कडक उन्हामुळे हे पक्षी उन्हाळयात अडचणीत सापडतात. त्यांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत होती. अभयारण्य परिसरात पक्ष्यांसाठी तीन तलाव खोदण्यात आले असले तरी ते दरवर्षी डिसेंबर महिन्याच्या मध्यंतरातच हे तलाव तळ गाठतात. गेल्या वर्षी सुद्धा लवकरच तलावातील पाणी बदलत्या हवामानामुळे आटले. त्यामुळे अभयारण्यात गेल्या काही वर्षापासून उन्हाळयात तीव्र पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.


दरम्यान, संपूर्ण अभयारण्यात पाण्यासाठी एकच बोअरवेल असून पाईपलाईनच्या माध्यमातून विश्राम गृहापर्यंत पाणी नेले जात होते. परंतु, कडक उन्हाळयात पाणी पुरेशे पडत नाही. विशेष म्हणजे १२ कि.मी. क्षेत्र असलेल्या या अभयारण्यात कुंडया ठेवाव्या लागत होत्या. मात्र, गेल्या वर्षी पाणीटंचाई निवारण्याकरीता प्रशासनाने विश्रामगृहालगत असलेला सिमेंटच्या बंधाऱ्यातील माती आणि गाळ उपसला आहे. त्याचबरोबर या बंधाऱ्याची डागडूजी सुध्दा केली असून पाणी टंचाईवर वन विभागाकडून विविध उपाय योजना राबवल्या जात असल्याचे वन अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

# नेत्रतपासणीला प्रतिसाद

**। रसायनी । वार्ताहर ।**

वासांबे मोहोपाडा येथील गणेश मंदिर, रसेश्वर मंदिर ट्रस्ट आणि आर. झुनझुनवाला, शंकरा आय रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोपाडा श्रीगणेश मंदिराच्या सभागृहात नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिराचा ९० जणांनी लाभ घेतला. तसेच १४ लाभार्थ्यांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नवीन पनवेल येथील शंकरा हॉस्पिटल येथे रवाना करण्यात आले. शिबिर यशस्वी करण्यासाठी रसेश्वर मंदिराच्या वतीने संदीप मुंढे, विश्वस्त गणेश काळे, दत्तात्रेय जांभळे, एकनाथ पाटील, कैलास म्हात्रे यांनी सहकार्य केले.

# सामराजगड एक अपरिचित शिवकालीन दुर्ग



● मुरुड एकदरा टेकडीवर वसलेले सामराज गडाची अतिशय दुरावस्था झाली आहे. पुन्हा संवर्धनाची गरज आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)

**। मुरुड जंजिरा । वार्ताहर ।**

सामराजगड हा किल्ला मुरुडच्या दक्षिण दिशेस असलेल्या एकदरा गावात असून त्याची उंची समुद्रसपाटीपासून अंदाजे ८० मीटर आहे. मुरुड खाडीवरील पूल ओलांडून एकदरा गावात शिरल्यावर तेथून गावाच्या मागे असलेल्या सामराजगड इतिहासाचा अविभाज्य भाग आहे. शिवरायांनी जंजिरा किल्ल्याच्या स्वारीवेळी टेहळणी गड म्हणून बांधला होता. परंतु, आज त्या गडाचा वापर खडक दर्शक दिवा म्यहणून होत आहे. गडाचे सर्व बुरुज नष्ट झालेत परंतु, या गडावरून जंजिरा किल्ला व पदामदुर्ग किल्ला अगदी जवळ दिसतो. स्वारी काळात लक्ष ठेवण्यासाठी गडाचा वापर होत असे. गडाच्या संवर्धाची गरज आहे.

मुरुड तालुक्यातील सामराजगड हा एक ऐतिहासिक मात्र, अपरिचित दुर्ग आहे. मुरुड-जंजिरा येथे आल्यावर पर्यटक जंजिरा व पद्मदुर्ग या जलदुर्गांना आवर्जून भेट देतात. मात्र, काही जणांचीच पावले सामराजगडाकडे वळतात. याचे महत्वाचे कारण म्हणजे या गडाविषयी अनेकांना फारशी माहिती नाही. मात्र, गेल्या काही वर्षांत दुर्गप्रेमींच्या जागरूकतेमुळे या अपरिचित किल्ल्याकडे पर्यटकांची पावले वळायला लागली आहेत. गडाच्या पायथ्याशी एक शिवमंदिर असून रस्त्यात एकदरा गावातील घरे दुतर्फा दिसून येतात.

**■ टेहळणी गड होतोय उद्ध्वस्त संवर्धनाच्या प्रतिक्षेत**

गडावर तटबंदी व बुरुजांचे अवशेष आजही दिसून येतात. मात्र, काळाच्या ओघात त्यांचे अस्तित्व नष्ट होऊ लागले आहे. सामराजगडाचे महत्व हे त्याच्या उंचीमुळे नसून त्याचे स्थान आणि मराठ्यांचा प्रबळ शत्रू सिद्दी याची राजधानी असलेल्या जंजिरा या किल्ल्यावर वचक ठेवणे आणि राजपुरी खाडीवरील दळणवळणावर नियंत्रण ठेवण्यासाठी होते. किल्ल्यावरून जंजिरा, पद्मदुर्ग, मुरुड शहर, राजपुरी खाडी व अरबी समुद्र असा विस्तृत परिसर दृष्टिक्षेपात ठेवणे हा आहे


सामराज गडाच्या निर्मितीचा इतिहास फारसा उपलब्ध नाही. मात्र, छत्रपती शिवाजी महाराजांच्या महत्वाकांक्षी जंजिरा मोहिमांमध्ये हा किल्ला बांधण्यात आला असावा. अनेकांच्या मते सामराजगडाचे बांधकाम हे १६६१ साली जेव्हा शिवाजी महाराजांनी व्यंकोजीपंत यांना ५००० स्वार आणि २००० मावळे देऊन राजपुरीवर पाठवले होते, तेव्हा झाले असे मानतात.

# नवीन पालवीने झाडांचे आकर्षण वाढले

**। नेरळ । वार्ताहर ।**

माथेरानच्या जंगलातील झाडे वर्षभर वेगवेगळा अनुभव देत असतात. प्रामुख्याने वसंत ऋतूमध्ये फुटणारी नवीन पालवी आणि त्यानंतर वेगेवेगळ्या रंगांची छाया माथेरानच्या डोंगरात अनुभवता येते. वसंत ऋतू ते वैशाख या काळातील झाडांमधील बदलाचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासक येत असतात.

होळीपासून वसंताला सुरुवात झाली. तेव्हापासून माथेरानमधील निसर्ग मुक्तहस्ताने रंगांची उधळण करताना दिसत आहे. लांबलेली थंडी काहीशी कमी होत असताना नेरळ माथेरान घाटात नांगरखिंड परिसरात असलेली पळसाची झाडे फुलली आहेत. रानमोगऱ्याची फुले देखील या जंगलातील निसर्गाच्या शृंगारात भर घालताना दिसत आहेत.



जिल्ह्यातील निसर्गाचा वरदहस्त लाभलेले आणि निसर्गवैभवाचा मुक्तहस्ताने उधळण झालेल्या जंगलात अनेक वृक्षात वेगळ्या बदलाच्या संक्रमणात असल्याचे दिसून येते. झाडांची पाने मागील महिन्यात खडुन गेली आहेत. त्यानंतर आता नवीन पाळावी फुटली आहेत. गेल्या काही दिवसांपासून डोळ्यांना सुखद अनुभव देणारे चित्र नजरेस पडते आहे. वृक्षांनी आपले रूपडे पूर्णतः पालटून टाकले आहे. हिरव्या गच्च असणाऱ्या झाडांमधून कोवळी पालवी धारण करून रंगीबिरंगी छटा दिवसागणिक दिसत आहे.

वसंत सुरु झाला असून आता कोवळी पाने काही दिवसांनी गडद लाल पाने असे रंग बदलून पुन्हा आपल्या हिरव्या रंगाकडे मार्गक्रमण करत पाने पूर्वावस्था धारण करतात. निसर्गाचा हा प्रवास निसर्ग प्रेमींसाठी पर्वणी ठरत आहे. नेरळ माथेरान घाट वगळता अन्य ठिकाणी झाडे एकमेकांवर स्पर्धा करीत आहेत. नेरळ माथेरान घाटात झाडांमधील नवीन पालवीमुळे दिसणारी रंगांची उधळण बदल अनुभवता येत आहे. रस्त्याच्याकडेला बागेत पिवळ्या झुपक्याचा बहावा दिसतो, कुठे जांभळ्या रंगाच्या कागदी फुलांचा ताम्हण लक्ष वेधतो तर कुठे पांगारा, विविधरंगी बोगनवेल अशी विविध प्रकारची फुलझाडे बहरतात. अनेक झाडांच्या पानांनी रंग भरलेला दिसून येत आहे. असा रंगोत्सवात महिनाभर रंग खेळणारा निसर्ग माथेरानच्या अवतीभोवती दिसत आहे.

# यापेक्षा ब्रिटीश बरे होते

यंदाच्या लोकसभा निवडणुकांमध्ये स्वतः जिंकण्यापेक्षा विरोधी पक्षांना संपवून टाकणे हाच भाजपचा एकमेव उद्देश दिसतो आहे. वेगवेगळ्या पक्षांना जायबंदी करण्याचे वेगवेगळे मार्ग वापरले जात आहेत. आम आदमी पक्षावर दारु धोरण घोटाळ्याचा आरोप करून त्याच्या नेत्यांना तुरुंगात टाकण्याचे सत्र चालू आहे. गेले वर्षभर मनिष सिसोदिया तुरुंगात आहेत. आता अरविंद केजरीवाल यांना अडकवण्यात आले आहे. कदाचित आणखीही काही आमदार व मंत्री आत जातील. ऐन निवडणुकीत सर्व पक्ष विस्कळीत करून टाकायचा अशी ही योजना आहे. चंडीगडच्या महापौर निवडणुकीत काँग्रेस व आम आदमी पक्ष एकत्र आले. भाजपचा पराभव नक्की होता. तेथे विरोधकांची मते बाद करण्याचा कुटील डाव भाजपवाले खेळले. सर्वोच्च न्यायालयाने तो उधळून लावला. काँग्रेस व आपचा संयुक्त उमेदवार महापौर झाला. पाठोपाठ दोन्ही पक्षांनी दिल्लीमध्ये एकत्र लढण्याचे जाहीर केले. त्यासरशी केजरीवालांना आत टाकण्याच्या हालचाली वाढल्या. सध्याचा संदेश हाच आहे की, काँग्रेससोबत युती करून भाजपविरोधी आघाडी बळकट करू पाहाल तर तुम्हाला अडकवले जाईल. यापूर्वी झारखंडमध्ये हेमंत सोरेन यांना इडीने अटक केली. महाराष्ट्रात शिवसेना, राष्ट्रवादी यांचे पक्ष फोडण्यात आले. त्यांच्या नेत्यांच्या विरुद्ध इडीच्या कारवाया चालू आहेत. तमिळनाडूमध्ये सत्तारुढ द्रमुकचे नेते व मंत्री यांच्या चौकशा चालू करून देण्यात आल्या आहेत. केरळचे मुख्यमंत्री पिनाराई विजयन यांच्या मुलीच्या कंपनीची आजवर शेकडो वेळा तपासणी झाली असेल. आता निवडणुकीच्या तोंडावर पुन्हा एकवार चौकशी मागे लागली आहे. विरोधी पक्षांना चौकशीच्या व संशयाच्या फेऱ्यांमध्ये अडकवून टाकायचे, वेळ, पैसा यांची बरबादी करायची, त्यांची प्रतिष्ठा खच्ची करायची असे हे सर्व डावपेच आहेत. इडी, सीबीआय, प्राप्तिकर खाते अशा सर्व सरकारी यंत्रणांचा वापर करून विरोधकांना खलास करण्याचे हे प्रयत्न एखाद्या गुंड टोळीला साजेसे आहेत. भाजपचे मोदी सरकार हे लोकनियुक्त असले तरी त्यांचे सर्व वागणे हे एखाद्या टोळीसारखेच आहे.

### सत्ता-संपत्ती-सत्ता

निवडणूक रोख्यांमार्फत भाजपला सर्वाधिक म्हणजे साडेआठ हजार कोटी रुपये मिळाले. या देणग्या ज्यांनी दिल्या त्यांना सरकारी कंत्राटे देण्यात आली. काही कंपन्यांवर आधी धाडी पडल्या. मग मांडवली म्हणून बहुदा भाजपला देणगी दिली गेली. मग कंपनीची सुटका झाली. अनेक औषधी कंपन्यांची औषधे खराब असल्याचे रिपोर्ट आले होते. त्यांच्याविरुद्ध इतरही चौकशा चालू होत्या. त्यांनी हजारो कोटींच्या देणग्या दिल्या आणि आपली मान सोडवून घेतली. विरोधकांनी, मिडियामधून असे आरोप पुराव्यानिशी करण्यात आले आहेत. इडी किंवा सीबीआय इत्यादी खरेच निःपक्ष असत्या तर त्यांनी भाजपला मिळालेल्या पैशांचीही चौकशी सुरू केली असती. पण अशी एकही चौकशी आजतागायत झालेली नाही. होण्याची शक्यताही नाही. गेल्या दहा वर्षात भाजपशासित राज्यातील एकाही मंत्री वा मुख्यमंत्र्यांवर कोणतीही कारवाई झालेली नाही. मोदी सरकारने अदानीला मोक्याचे विमानतळ, बंदरे बहाल केली. धारावीसारखी महत्त्वाची कंत्राटे अदानीलाच मिळाली. त्यासाठी अदानीच्या विरोधकांना सरकारी यंत्रणा वापरून नामोहरम करण्यात आले. असे झाल्यावर अदानीला धंद्यामध्ये कोणी विरोधक उरत नाही. मग त्याची संपत्ती वाढत जाते व सर्वात यशस्वी उद्योगपती म्हणून मिरवायला तो मोकळा होतो. संपत्तीतून सत्ता आणि पैसा आणि त्यातून पुन्हा संपत्ती असे हे चक्र आहे. भाजपने २०२४ मध्ये राजकीय क्षेत्रात नेमके हेच धोरण अवलंबले आहे. निवडणुकांमधील यश किंवा अपयशावर लोकशाहीतील पक्षांची वाटचाल ठरते. पण आपल्याखेरीज करून निवडणुकांमध्ये कोणी विरोधी पक्ष उभे राहण्याइतपत देखील टिकू नयेत असे भाजपचे सर्व प्रयत्न चालू आहेत. किरकोळ काही पक्षांना अस्तित्व कायम ठेवू मात्र दिले जाते. जेणेकरून, आपण लोकशाही मार्गाने सत्तेत येत असल्याचे भाजप जगाला दाखवू शकतो.

### वैऱ्याहूनही वैरी

यांच्यापेक्षा ब्रिटीश बरे होते असे काही जुने लोक म्हणतील. बरोबर शंभर वर्षांपूर्वी १९२० मध्ये मॉन्टेग्यू व चेम्सफर्ड सुधारणांद्वारे भारतातील लोकशाही निवडणुकांचा पाया घातला गेला. परकी सत्ता असूनदेखील त्यांना येथील लोकांचे निवडून आलेले प्रतिनिधी सरकारी कायदेमंडळात असणे गरजेचे आहेत असे वाटले. तेव्हापासून मर्यादित प्रमाणात का होईना पण हिंदी जनतेचे नेते तेथे जात राहिले. आज राष्ट्रवादाच्या गप्पा मारणाऱ्या भाजपला मात्र विरोधी पक्ष व त्यांचे नेते डोळ्यापुढेही नकोसे झाले आहेत. काँग्रेसला अलिकडेच साडेतीन हजार कोटी रुपयांच्या आयकराच्या नोटिसा आल्या आहेत. जुन्या काळात काँग्रेसने आपल्याला मिळालेल्या देणग्यांचा तपशील दिलेला नाही असा आरोप आहे. यातले एक प्रकरण १९९४ चे तर बाकीची मोदी सरकार आल्यानंतरची आहेत. सर्व मिळून केवळ चौदा लाखांच्या देणग्यांबाबतचा हा तपशील आहे असे काँग्रेसचे म्हणणे आहे. या इतका काळ प्राप्तिकर खात्याचे अधिकारी झोपलेले होते. निवडणुका येताच त्यांच्या पायावर चक्र पडले आहे व ते काँग्रेसच्या मागे लागले आहेत. काँग्रेसने देणगीदार किंवा त्यांचे पत्ते पूर्णपणे न दिल्याचे आरोप आहेत. पण भाजपकडच्या तब्बल ४२ कोटींच्या देणग्या अशा आहेत की ज्यांच्यावर नाव-पत्ते नीट नाहीत. तरीही भाजपला एकही नोटीस दिली गेलेली नाही. प्राप्तिकर कायद्यातील बदलांनुसार, खरे तर इतक्या वर्षांची जुनी प्रकरणे पुन्हा उकरून काढता येत नाहीत. पण प्राप्तिकर खात्याने ते केले आहे. आता त्या नोटिसींना न्यायालयात आव्हान देणे व अपिलात जाणे असे उद्योग काँग्रेस किंवा तत्सम पक्षांना करीत राहावे लागतील. दुसरीकडे याच प्रकरणात काँग्रेसची बँक खाती गोठवण्यात आली आहेत. निवडणुकीत खर्चासाठी त्यांना बिलकुल पैसा मिळू नये अशी जालीम व्यवस्था केली जाते आहे. शंभर वर्षांपूर्वी काँग्रेस पक्ष ब्रिटिशांना या देशातून घालवून देण्यासाठीच आंदोलन करीत होता. तरीही ब्रिटिशांनी त्याच्याशी जे वैर धरले नव्हते ते आज भाजपने धरले आहे.

**विचार**

# सत्तानाट्यामध्ये केजरीवाल यांचा ट्विस्ट

**आम आदमी पक्षाचे संयोजक अरविंद केजरीवाल यांना 'ईडी'ने दारू घोटाळ्यात अटक केल्यनंतर विरोधी पक्षीय नेते आणि 'आप'चे कार्यकर्ते त्रागा करत आहेत. मोदी सरकार केंद्रीय तपास यंत्रणांचा गैरवापर करत असल्याचा आरोप ते करत आहेत. सत्ताधारी पक्षाच्या प्रत्येक कृतीमध्ये विरोधकांना दोष दिसण्यात नवीन काही नाही; परंतु अटक होऊनही मुख्यमंत्रिपदी राहण्याचा केजरीवाल यांचाही अट्टाहास रास्त नाही.**



**राही भिडे**

जगात आपणच स्वच्छ चारित्र्याचे असल्याचा गवगवा करणाऱ्या अरविंद केजरीवाल यांचा बुरखा तपास यंत्रणांनी टराटरा फाडला आहे. दिल्लीतील मद्य घोटाळा हा शंभर कोटी रुपयांचा नसून सहाशे कोटी रुपयांचा असल्याचे उघडकीस आले आहे. तपास यंत्रणा आणि न्यायालयावरही अविश्वास दाखवण्याची त्यांची वृत्ती घातक आहे. धोरण आणि नैतिकतेच्या गप्पा मारणारे केजरीवाल यांचे पाय कसे मातीचे आहेत, हे मद्य घोटाळ्यातील आरोपावरून पुढे आले आहे. सध्याच्या विरोधी पक्षातील दोन माजी मुख्यमंत्र्यांची उदाहरणे त्यांच्यासमोर असताना त्यांनी त्याकडे डोळेझाक केल्याने त्यांच्यावर ही वेळ आली आहे. लालूप्रसाद यादव यांना पशुसंवर्धन घोटाळ्यात 'सीबीआय'ने अटक केली, तेव्हा त्यांनी राजीनामा देऊन पत्नी राबडीदेवी यांना मुख्यमंत्री केले. झारखंडचे माजी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांचे उदाहरण तर ताजे आहे. जमीन घोटाळ्यात ईडीकडून आपल्याला अटक होईल, अशी भीती वाटत असतानाच त्यांनी राजीनामा दिला होता. केजरीवाल मंत्रिमंडळातील सत्येंद्र जैन आणि मनीष सिसोदिया हे दोन सदस्यही तुरुंगात आहेत. जैन यांना ३१ मे २०२२ रोजी अटक करण्यात आली होती. त्यानंतर सिसोदिया यांना अटक करण्यात आली. तुरुंगात गेल्यानंतर श्री. जैन नऊ महिने मंत्री म्हणून पगार घेत होतेच, पण या काळात त्यांनी भत्तेही घेतल्याचे माहिती अधिकार कायद्याखाली मागवलेल्या माहितीतून उघड झाले. तुरुंगात असतानाही ते नऊ महिने मंत्री राहिले, असा याचा अर्थ होतो. यातून केजरीवाल यांचे धोरण, हेतू आणि नैतिकता दिसून येते.

तुरुंगातूनच सरकार चालवणार असल्याचे केजरीवाल यांनी म्हटले आहे.

न्यायालयाच्या आदेशानुसार ते सध्या 'ईडी'च्या कोठडीत आहेत. तुरुंगातून ते सरकार कसे चालवणार याचे पहिले उदाहरण समोर आले. त्यांनी दिल्लीतील पाणीपुरवठ्याबाबत आदेश जारी केला आहे. त्यांच्या मंत्रिमंडळातील सहकारी आतिशी यांनी 'मीडिया' समोर त्यांचा आदेश वाचून दाखवला. जिथे पाण्याची कमतरता आहे तिथे योग्य संख्येने टँकरची व्यवस्था करा, मुख्य सचिव आणि इतर अधिकाऱ्यांना योग्य ते आदेश द्या; जेणेकरून जनतेला कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही, असे या आदेशात म्हटले आहे. लोकांची आपल्याला किती काळजी आहे, हे दाखवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. एक काळ असा होता, की लालकृष्ण अडवाणी, माधवराव शिंदे, कमलनाथ यांच्यासारख्या नेत्यांची नावे हवाला व्यापाऱ्याच्या कथित जैन डायरीत आली होती. त्यांच्यावर लाच घेतल्याचा आरोप झाला होता, तेव्हा त्यांनी नैतिकतेच्या आधारावर तात्काळ आपल्या पदाचा राजीनामा दिला होता. लालबहादूर शास्त्री यांनी रेल्वे अपघातानंतर राजीनामा दिला होता. काही महिन्यांपूर्वी झारखंडचे मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांनी अटकेपूर्वी राजीनामा देऊन नैतिक आचरणाचे दर्शन घडवले होते. भारताला अशी समृद्ध परंपरा आहे. दिल्लीतील दारू घोटाळ्याचे सत्य काय आहे हे न्यायालयाला ठरवायचे आहे; पण या घोटाळ्यात एका मुख्यमंत्र्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले आहेत. त्यांना अटक करण्यात आली आहे. मात्र तरीही ते मुख्यमंत्रिपदाला चिकटून आहेत.

राजकारणाचे गटार स्वच्छ करण्याच्या नादात त्या गटाराचे भाग होत असल्यास आपल्याला इतरांकडे बोट दाखवण्याचा अधिकार राहत नाही, हे केजरीवाल यांच्या उदाहरणातून स्पष्ट झाले आहे. केवळ पैसे खाणे हा भ्रष्टाचार नाही, तर आचार विशुद्ध नसणे, कायदे पाळण्यास नकार देणे हा ही भ्रष्टाचारच आहे, हे त्यांना समजायला हवे. तपासी यंत्रणा भाजपच्या हाती आहेत, असा आरोप करून चालत नाही, तर तो सिद्ध करावा लागतो. तपास यंत्रणांना जुमानायचेच नाही, त्यांच्या दहा-दहा समन्सकडे दुर्लक्ष करायचे, हे कायद्याच्या राज्याला आव्हान होते. यंत्रणांच्या विरोधात न्यायालयात दाद मागण्याचा पर्याय होता; परंतु दहा समन्स येईपर्यंत आणि अटक होण्याची भीती वारंवार व्यक्त करण्याऐवजी सुरुवातीलाच चौकशीला सामोरे गेले असते, तर ऐन लोकसभेच्या निवडणुकीच्या काळात पक्षाला नेतृत्वाविना लढावे लागले नसते. अटक झाल्यानंतरही पदाचा राजीनामा न देण्याचा केजरीवाल यांचा हट्ट प्रशासनावर परिणाम करणार आहे. पंतप्रधान मोदी यांच्यावर एकाधिकारशाहीचा आरोप करता करता आपणही त्याच मार्गाने चाललो आहोत, हे त्यांच्या लक्षात येत नाही. दिल्ली मद्य घोटाळ्यात तथ्य नसेल, तर यापूर्वी अटक केलेल्या उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांच्यासह अन्य व्यक्तींना अजूनही जामीन का मिळाला नाही, हा प्रश्न उरतोच. तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांच्या कन्या आमदार के. कविता यांना दिल्ली मद्य घोटाळ्यातील सहभाग आणि 'आप'ला शेकडो कोटी रुपये दिल्याप्रकरणी अटक झाल्यानंतरच केजरीवाल यांना कोणत्याही क्षणी अटक होईल, हा कयास प्रत्यक्षात आला आहे.

तीन वर्षांपूर्वी, १७ नोव्हेंबर २०२१ रोजी दिल्लीतील आम आदमी पक्षाच्या सरकारने नवीन दारू धोरण लागू केले होते. या नवीन धोरणानुसार दिल्लीची एकूण ३२ झोनमध्ये विभागणी करण्यात आली असून प्रत्येक झोनमध्ये तुम्ही दारूची २७ दुकाने उघडू शकता, असे सांगण्यात आले. या आकडेवारीनुसार एकूण ८४९ दुकाने उघडली जाणार होती. पूर्वी दारू व्यवसायात सरकारचा सहभाग होता. तो नवीन धोरणानुसार रद्द करण्यात आला. नवीन धोरण लागू होण्यापूर्वी दिल्लीतील दारूची ६० टक्के दुकाने सरकारी मालकीची होती, तर ४० टक्के खासगी कंपन्यांच्या मालकीची होती; मात्र नवीन धोरणानंतर दुकानांचे शंभर टक्के खासगीकरण होणार असल्याची चर्चा होती. या धोरणानंतर ३५०० कोटी रुपयांचा थेट फायदा होईल, असा केजरीवाल सरकारचा अंदाज होता. नवीन धोरणानंतर दारू दुकानाच्या परवान्याचे शुल्क अनेक पटींनी वाढले. तांत्रिक भाषेत याला एल१ लायसन्स म्हणतात. त्यासाठी दुकानदार आधी २५ लाख रुपये देत असत. आता त्याला पाच कोटी रुपये द्यावे लागतात. नवीन धोरण लागू झाल्यानंतर महसुलात मोठी घट झाल्याचा आरोप होऊ लागला. ७५० मिलीलीटर दारूची किंमत ५३० रुपयांवरून ५६० रुपये करण्यात आली आहे. त्यामुळे किरकोळ व्यापाऱ्याचा नफा ३३.३५ रुपयांवरून ३६३.२७ रुपयांपर्यंत वाढला. याचा सरळ अर्थ किरकोळ व्यावसायिकाला दहापट नफा मिळत होता; पण सरकारला पूर्वी मिळणारा ३२९.८९ रुपयांचा फायदा ३.७८ रुपयांवर आला आहे. त्यामुळे सरकारचे मोठे नुकसान झाले. असे हे प्रकरण आहे.

या प्रकरणी के. कविता यांना अटक करण्यात आली. बुचीबाबू या अकौंटंटचीही 'ईडी'ने अनेक तास चौकशी केली. त्यांनीच या प्रकरणात सर्वात आधी केजरीवाल यांचे नाव घेतले. कविता, सिसोदिया आणि केजरीवाल यांच्यात राजकीय साटेलोटे सुरू असल्याचा दावा त्यांनी केला होता. 'ईडी'च्या तपासात असेही दिसले की सिसोदिया आणि केजरीवाल हे उत्पादन शुल्क धोरणावर एकत्र काम करत होते. सिसोदिया यांच्यावर काही आरोप झाले तर केजरीवाल यांची चौकशी होणे अपरिहार्य होते. भ्रष्टाचाराचा मुद्दा असो वा दारू व्यवसाय; दोन्ही मुद्द्यांवर भाजप 'आप'ची कोंडी करत आहे. अर्थात मोदी यांच्याप्रमाणेच केजरीवाल यांना आव्हानांचे रूपांतर संधीमध्ये कसे करायचे हे माहीत आहे. दिल्लीतील एक मोठा वर्ग केजरीवाल यांच्याकडे नायक म्हणून पाहतो. नायकाला अटक करणारे खलनायक असल्याच्या भावनेने हा वर्ग त्वेषाने पेटून उठला, तर भाजपला राजकीय नुकसान सोसण्याची तयारी ठेवावी लागेल.

'आप'ची ओळख आंदोलनामधूनच निर्माण झाली आहे. अशा परिस्थितीत या खेळपट्टीवर ती सर्वात मजबूत मानली जाते. केजरीवाल हे 'आप'चे मेंदू आणि आधारस्तंभ आहेत, त्यांच्याशिवाय 'आप' निवडणूक प्रचारात कोणताही प्रभाव पाडू शकणार नाही, असे भाजपला वाटते. २५ मे रोजी दिल्लीत निवडणुका होणार आहेत. तोपर्यंत केजरीवाल तुरुंगात राहिले, तर 'आप' कमकुवत होईल आणि निवडणूक लढवण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल, असे मानणारा एक वर्ग आहे. मोफत वीज, पाणी, आरोग्य आणि शिक्षण या योजनांमुळे केजरीवाल मोदी सरकारच्या चांगल्या कामांशी स्पर्धा करत असल्याने केजरीवाल हा आपल्यासाठी धोका असल्याचे भाजप नेत्यांचे मत आहे.

अटक झाल्यानंतर पदाचा राजीनामा देणे मुख्यमंत्र्यांना बंधनकारक नसते. कायद्याच्या दृष्टीने अटक होणे म्हणजे दोष सिद्ध झाला असे होत नाही. त्यामुळे कोणत्याही मुख्यमंत्र्यांना अटक झाल्यानंतर त्यांचा राजीनामा घेता येत नाही; मात्र तुरुंगामधून सरकार चालवणे कसे शक्य आहे हा चर्चेचा विषय ठरू शकतो.

**आजकाल**

# सुशीला सदन रितं झालं!

आदरणीय स्वर्गीय मीनाक्षीताई पाटील यांना भावपूर्ण श्रद्धांजली. शुक्रवार २९ मार्च २०२४ रोजी सकाळी दुःखद सुन्न करणारी बातमी कानावर आली. आजचा गुड फ्रायडे सर्वांसाठी ब्लॅक फ्रायडे ठरला. सर्वांच्या सुपरिचित माजी मंत्री मीनाक्षीताई पंचतत्वात विलीन झाल्या. संपूर्ण पाटील परिवार, रायगड शोकसागरात बुडाला. सर्वांच्या लाडक्या ताई इहलोकीची यात्रा संपून स्वर्गस्थ झाल्या. एक झंझावाती वादळ शमलं आहे. स्वर्गस्थ मीनाक्षीताई स्वर्गात पोहोचल्या आहेत. त्यांच्यासाठी लाल गालीचा आणि पुष्पमालिका घेऊन आपल्या लाडक्या लेकीच्या स्वागतासाठी स्वर्गीय भाऊ, स्वर्गीय सुलभा काकू, आजोबा क्रांतिसूर्य नाना पाटील, दादा सज्ज असतील. बेबीताईंवर सर्वजण फुलांची उधळण करून स्वर्गात स्वागत करतील, याबाबत माझ्या मनात तिळमात्र शंका नाही. जनसामान्यांच्या लाडक्या ताई, सर्वदूर ख्याती असणाऱ्या मीनाक्षीताई पंचत्वात विलीन झाल्यात. ताई, आज आम्हा सर्वांना दुःखसागरात लोटून गेल्यात, येथील माती अश्रुंनी भिजली आहे. तीच माती सुजलाम् सुफलाम् होणार आहे. आपले बंधू आमदार जयंत पाटील, माजी आमदार पंडित पाटील, ॲड. राजन पाटील, तुमची लाडकी बहीण नंदाताई शोकसागरात बुडाली आहे.

तुमच्यावर जिवापाड प्रेम करणाऱ्या कल्पनाताई, भावनाताई, नीताताई, चित्राताई, चित्रलेखाताई, सुमनाताई यांना आज खऱ्या अर्थाने रितेपणाची जाणीव होईल. आपण या सर्वांच्या आधारवड, मार्गदर्शक होतात. आपल्या मार्गदर्शनाने सर्वांनी विविध क्षेत्रात झेप घेतली आहे.



भरलं घर 'सुशीला सदन' रितं झाल्याचं त्यांना जाणवेल. तुमचा लाडका लेक आस्वाद रोज पदस्पर्श करायचा. आता फोटोतच आपण त्याला दिसणार आहात. नृपालशेठ, सवाईशेठ, ओजस, अर्णव, राजकुमार, राजनंदिनी आपल्या आठवणीतच रमणार आहेत. या सर्वांचे तुम्ही प्रेरणास्तोत्र होतात. आपण त्यांचे कोडकौतुक करायच्यात. आपण सर्वांवर आभाळ भरून माया केलीत. आज पाटील परिवाराबरोबरच साऱ्या कार्यकर्त्यांना आपण पोरके करुन गेल्या आहात. सर्वांना हव्या-हव्याशा वाटणाऱ्या लाडक्या मीनाक्षीताई आपली अमोघवाणी, आवेशपूर्ण भाषणं चिरस्मरणात राहतील. ताई, तुम्हाला त्रिवार लाल सलाम, लाल सलाम.

**रामचंद्र देवजी म्हात्रे**
**आंबेपूर, पेझारी नाका**
८००७७३२३३८

**लोकसंसद**

## पर्यावरण रक्षणाची सुंदर कल्पना!

ओडिशा राज्याची राजधानी असलेल्या भुवनेश्वर येथे नंदनकानन नावाचे प्राणीसंग्रहालय आणि वनस्पती उद्यान आहे. या ठिकाणी जाण्याचा योग आला. जवळपास एक हजार एकरवर पसरलेले नंदनकानन उद्यान हे भारतातील तामिळनाडूच्या पंधराशे एकरवर पसरलेल्या वंडलूर प्राणीसंग्रहालयानंतर भारतातील सर्वात मोठे प्राणीसंग्रहालय आहे. नंदनकानन उद्यानातील एक नियम अतिशय वाखाणण्याजोगा आहे. तो म्हणजे एखादा पर्यटक उद्यानात जाताना जर पाण्याची, कोल्ड्रिंकची बाटली किंवा कोणत्याही प्रकारची प्लास्टिकची वस्तू घेऊन जात असेल तर त्याच्या बाटलीवर किंवा वस्तूवर ५० रुपयांचे सुरक्षा स्टिकर लावण्यात येते. उद्यान फिरून झाल्यानंतर परत जाताना जर ही प्लास्टिकची बाटली गेटवर परत दिली की ते ५० रुपये पुन्हा पर्यटकांना दिले जातात. ५० रुपये मिळवण्यासाठी प्रत्येकजण त्यांच्या रिकाम्या प्लास्टिक बाटल्या गेटवर परत करतो. याचा परिणाम असा झाला आहे की, अवाढव्य पसरलेल्या नंदनकाननमध्ये प्लास्टिकची एकही बाटली किंवा कचरा दिसत नाही. पर्यावरणाचे रक्षण आणि जतन करण्यासाठी ही एक चांगली कल्पना असून देशातील सार्वजनिक उद्याने, पर्यटन स्थळे, समुद्र किनारे, गडकिल्ले अशा सर्वच ठिकाणी ती राबवली पाहिजे. जेणेकरून इकडे तिकडे प्लास्टिकच्या वस्तू फेकण्याच्या प्रवृत्तीला आपोआपच आळा बसेल.

**-प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**दोन एप्रिल**

**१९०७:-** लेखक, निर्माता, निर्देशक, आत्मचरित्रकार गजानन जनार्दन जहागिरदार यांचा जन्म. सहा चित्रपट पटकथांच्या लेखनासह 'अभिनय कसा करावा' हा अभिनयाचे शिक्षण देणारा ग्रंथ, तसेच 'पाऊलखुणा' हे आत्मचरित्र आणि 'संध्याकाळ' हे आठवणी वजा पुस्तक आदी साहित्य संपदा. **१९१९:-** लेखक, कवी, पेशाने वकील माधव कृष्ण ताम्हनकर यांचा जन्म. संगीत, व्यायाम, ज्योतिष, मानसशास्त्र हे त्यांच्या आवडीचे विषय. 'बोलका अंगठा व इतर गोष्टी' हे त्यांचे न्यायालयीन निवाड्यावर आधारीत कथासंग्रहाचे पुस्तक प्रकाशित. **१९२६:-** 'त्या फुलांच्या गंधकोषी, सांग तू आहेस का' या गाण्याचे कवी सूर्यकांत रामचंद्र खांडेकर यांच जन्म. आकाशवाणीचे मान्यताप्राप्त कवी ही त्यांची आणखी एक ओळख. त्यांनी व्रत, जातिछंदोबद्ध कविताच केली ती गीत प्रवृत्तीची आहे. 'सावली', 'पानफुल', 'छुमछुम' (बालकविता) हे त्यांचे काव्यसंग्रह प्रकाशित. 'या फुलांच्या गंधकोषी' या गीताला स्वरराज चढवून हृदयनाथ मंगेशकरांनी ते गीत अजरामर केले. **१९३४:-** लेखक राष्ट्रीय पंडित श्री. विनायक गोविंद देसाई यांचा जन्म. वेद उपनिषदे, श्रीदत्त संप्रदायातील तत्त्वग्रंथ, स्तोत्रवाङ्‌मय इत्यादी वैदिक तत्त्वज्ञानावर आधारित अनेक संस्कृत ग्रंथांचे परिशीलन, चिंतन व त्यांचा यथार्थ मराठी अनुवाद करुन, त्यायोगे हे प्राचीन विचारधन सांप्रतच्या काळात सोप्या भाषेत सर्व जनांना परिचित करुन देण्याचे अमूल्य कार्य. एकूण १९ ग्रंथ प्रकाशित. त्यापैकी महत्त्वपूर्ण ग्रंथ असे 'सार्थ उपनिषद् विशतिका', 'सार्थ श्रीज्ञानदेवीगीता', 'सार्थ उपनिषतत्रयी', 'सार्थ श्रीदत्तात्रेयवज्रकवचम', 'सार्थ संक्षिप्त श्रीदेवीपाठ', 'सार्थ श्रीकृष्ण स्तोत्राणि', 'सुभाषित रत्नावली', 'सार्थ श्रीदत्तात्रय पंचरत्न' तसेच कन्नड भाषेतूनही त्यांनी लेखन केले आहे. **१९३४:-** अनुवादक वि. गो. देसाई यांचा जन्म. स्वतंत्र ग्रंथरचना त्यांच्या नावावर नसली तरी 'श्रीमद्भागवत', 'रामायण', 'गीतातत्त्वे विरेचती', 'गुढार्थदीपिका' यासारख्या ग्रंथाचे अनुवाद वा संपादन त्यांनी केलेले असून त्यांची संख्या १०० च्या आसपास आहे. **१९४२:-** कथा, कादंबरीकार, नाटककार किरण कमलाकर नगरकर यांचा जन्म. ७ सेकंद ४३ ही त्यांची गाजलेली कादंबरी. त्यानंतर बेड 'टाईम स्टोरी' व 'कबीराचं काय करायचं' हे नाटके त्यांनी लिहिली. त्यांचे लेखन विचार व चिंतन करायला लावणारे आहे. 'रावण अँड एडी' हा अनुवाद आणि ककोल्ड ही इंग्रजी कादंबरी त्यांनी लिहिली. **१९५०:-** लेखक संत तेजराम धोंडू लोभे यांचा जन्म. त्यांचा 'जीवन धर्म ईश्वर योग' हा अध्यात्मिक ग्रंथ प्रकाशित झाला आहे. **१९५१:-** वाणिज्य शाखेतील विषयावरील पुस्तकांचे लेखक प्रा. प्रदीप गणेश कुलकर्णी यांचा जन्म. ह्या 'व्यवसाय व्यवस्थापन - व्यवस्थापकाची कार्ये', 'व्यवसाय व्यवस्थापन- व्यवस्थापनाची मुलतत्त्वे', 'व्यवसाय संघटन', 'व्यापार संघटन व रचना' या ग्रंथासह वाणिज्य शाखेतील महाविद्यालयीन पाठ्यक्रमावर आधारित पुस्तके लिहिलीत. **१९५२:-** साहित्यिक, व्याख्याते प्राचार्य अशोक नारायण आहेर यांचा जन्म. 'सनसेट', 'कोंडमारा', 'श्रावणी हिरवळ', 'उन-सावल्या' या कादंबऱ्या. तसेच 'वर्तुळातील त्रिकोणी साज', 'चाकरी', 'स्मितकथा' हे कथासंग्रह. 'मनोदैवत','नामकस्तुरी', 'अखंड चिंतन' ह्या अध्यात्मिक ग्रंथाशिवाय 'मुखवट्यातले चेहरे', 'वासनाकांड', 'पोलिस डिटेक्टिव्ह' हे रहस्य कथासंग्रह ह्याशिवाय दै.सकाळ मधून बोधकथा प्रसिध्द तसेच शैक्षणिक, वैचारिक विषयांवरील पुस्तके प्रसिध्द. **१९७१:-** साहित्यिक बबन राघोजी शिंदे यांचा जन्म. 'काटेरी वाटा', 'प्रांजळ मन','एकोपा','पोटमारा', 'बडबडी बबली' या काव्यसंग्रहासह 'बुरुजावरचे भूत' ही कुमारकथा प्रसिध्द. **१९८८:-** आपल्या लेखनातून आगरकरांच्या विवेकवादी विचारसरणीचा पुरस्कार करणाऱ्या लेखिका, समीक्षक, विदूषी मनू गंगाधर नातू यांचे निधन. त्यांच्या साहित्य संपदेत 'विवेकाची शेवट गोडी' हा निबंध संग्रह, चि. त्र्यं. खानोलकरांच्या कथा-कादंबऱ्यांतून प्रकट होणाऱ्या स्त्री जीवनाच्या दु:खाचे विश्लेषण करणारा 'वेदनेचे वेद' हा लेखसंग्रह. तसेच त्यांनी प्रा. दि. य. देशपांडे यांच्या सहकार्याने आगरकरांचे तीन खंड संपादीत केले. **२००२:-** लेखक आणि आंबेडकर चळवळीचे अभ्यासक वसंत मून यांचे निधन. **२००५:-** वाङ्‌मयातील 'मराठी स्त्री' वर प्रबंध लिहिणारे, पुढे 'साहित्य संमेलने आणि साहित्यिक प्रश्न' या ग्रंथासह विविध विषयांवर लेखन करणारे वाङ्‌मय विश्लेषक, समीक्षक दुर्गादास काशिनाथ संत यांचे निधन. विविध नियतकालिकांतून कथा, लघुकथा, निबंध असे ललित स्वरुपाचे लेखन केले असले तरी त्यांची साहित्यिक ओळख आहे. ती वाङ्‌मयीन विश्लेषकाची 'संशोधन : पध्दती, प्रक्रिया, अंतरंग' 'ललितकला आणि ललित वाङ्‌मय' या सर्व लेखनातून त्यांचे वाङ्‌मयविषयक चिंतन प्रकट होते. याशिवाय 'गीतेतील पुरुषोत्तम आणि सातत्यदर्शन' व 'शोधविज्ञान कोष' ही पुस्तकेही त्यांचे वैशिष्ट्यपूर्ण आहेत. **२००९ :-** भावगीतगायक, आत्मचरित्रकार गजानन वाटवे यांचे निधन.

**संजय वझरेकर**
९९७५५७६६७५




# मावळ आमचा बालेकिल्ला

## नितीन सावंत यांचे प्रतिपादन

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत विधानसभा मतदारसंघ आणि मावळ लोकसभा मतदारसंघ हे दोन्ही मतदारसंघ आमचे बालेकिल्ले आहेत.सत्तेच्या राजकारणात तुम्ही आमची निवडणूक चिन्ह पळवून नेली असतील, पण जनता उध्दव ठाकरे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. त्यामुळे या निवडणुकीत शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचा उमेद्वार बहुमताने विजयी करतील. मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार संजोग-वाघेरे पाटील आहोत. त्याचे चिन्ह घराघरात पोहचावे असे आवाहन उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांनी केले.**




शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे या पक्षाच्या संपर्क कार्यालयात आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. ज्येष्ठ शिवसैनिक शशिकांत मोहिते यांनी आपली या निवडणुकीत कसोटी आहे. कसोटीच्या काळात सर्वांनी एकदिलाने पक्षाच्या मागे खंबीर राहिले पाहिजे. पक्षाला आज आपल्या एकजुटीची गरज असून कार्यकर्त्यांनी शेवटच्या मतदारापर्यंत जाऊन मशाल हे निवडणूक चिन्ह पोहचवण्याचे काम आपल्याला करायचे आहे असे आवाहन त्यांनी केले.

मावळ लोकसभा निवडणुकीच्या तयारीसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष सज्ज झाला आहे असा इशारा उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत यांनी विरोधकांना दिला.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार संजोग-वाघेरे पाटील यांच्या प्रचाराचे नियोजन करण्यासाठी पक्षाचे सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील कर्जत तालुक्यातून बहुमताने पुढे राहतील असा निर्धार व्यक्त करीत गाव-वाड्या - पाड्यात - शहरात जाऊन जोरदार प्रचार करण्याचे आदेश यावेळी देण्यात आले.

त्यासाठी प्रत्येक शिवसैनिक यांनी आपण स्वतः मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार असल्या सारखे वागावे आणि मतदारांना सांगावे असे आवाहन सावंत यांनी केले.

ठाकरे या पक्षाचा बालेकिल्ला असून त्याला इतर पक्षाची साथ असल्याने महाआघाडीचे मावळ लोकसभा मतदार संघाचे उमेदवार संजोग वाघेरे-पाटील यांना सर्व ताकद लावून बहुमताने निवडून आणणार यासाठी निर्धार केला.

त्यावेळी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपजिल्हा प्रमुख नितीन सावंत, महिला जिल्हा संघटिका सुवर्णा जोशी, तालुका प्रमुख उत्तम कोळंबे, जिल्हा सल्लागार रियाज बुबेरे, शिवसेना तालुका संघटक बाबु घारे, माजी उपतालुकाप्रमुख शशिकांत मोहिते, उपतालुकाप्रमुख प्रमोद सुर्वे, ज्येष्ठ कार्यकर्ते माजी सरपंच आवेश जुवारी आदी कार्यकर्ते आणि पक्षाचे पदाधिकारी, शाखा प्रमुख मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खासदार बारणे यांना कोंडीत पकडण्याची रणनीती

## वाघेरे-पाटील उचलणार विधानसभा मतदार संघातील स्थानिकांचे प्रश्न

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

मावळ लोकसभा मतदार संघांतुन खासदार म्हणून दोन वेळा निवडून आलेले श्रीरंग बारणे यांची पनवेल-उरण विधानसभा मतदार संघात कोंडीत पकडण्याची रणनीती शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाकडून अखण्यात आली आहे. मावळ लोकसभा मतदार संघा साठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. या मतदार संघात महायुती कडून खा. बारणे यांना उमेदवारी घोषित करण्यात आली आहे. बारणे यांनी या मतदार संघातून दोन वेळा खासदार झालेत. तर बारणे यांच्या विरोधात महाविकास आघाडीकडून पिंपरी चिंचवडचे माजी महापौर संजोग वाघेरे-पाटील यांना उमेदवारी देण्यात आली आहे. पुणे जिल्ह्यातील ३ तर रायगड जिल्ह्यातील ३ विधानसभा मतदार संघाचा समावेश असलेल्या मावळ मतदार संघातुन या वेळी जवळपास २५ लाखाच्या आसपास मतदार आपला मतदानाचा हक्क बाजवणार आहेत.



यामध्ये पनवेल विधानसभा मतदार संघातील ५ लाख ६५ हजार ९१५ मतदारांचा समावेश असून, त्या खालोखाल कर्जत विधानसभा मतदार संघातील ३ लाख ९ हजार, उरण मतदार संघातील ३ लाख ९ हजार २७५ मतदारांचा समावेश असल्याने २०२४ चा लोकसभेतील खासदार निवडण्यासाठी या मतदार संघातील मतदारांची भूमिका निर्णायक ठरणार असल्याने तिन्ही विधानसभा मतदार संघातील स्थानिकांचे दहा वर्षात न सुटलेले प्रश्न उचलून खा. बारणे यांना कोंडीत पकडन्याची रणनीती आघाडीकडून अखण्यात आली आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमान तळाला लोकनेते दि बा पाटील यांचे नाव देण्यात यावे या मागणीसाठी पनवेल-उरणमधील स्थानिक आक्रमक आहेत. त्याच प्रमाणे सिडकोच्या नैना प्रकल्पा विरोधात ग्रामस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात नाराजी असून, उरण पनवेल परिसरातील वायू प्रदूषण, प्रकल्प ग्रसतांच्या मोबदल्याचा विषय, पनवेल पालिका हद्दीतील नागरिकांच्या मालमत्ता कराचा विषय तसेच घोषणे नंतरही पनवेल परिसरात राखडलेल्या पासपोर्ट कार्यालयाचा विषयावरून खासदार बारणे यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न महाविकास आघाडीकडून केला जाऊ शकतो त्याच प्रमाणे वाढती महागाई, बेरोजगारी हे विषय देखील एजेंड्यावर घेण्यात येणार आहेत.

## वंचितची दुसरी यादी जाहीर

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने त्यांची दुसरी यादी जाहीर केली आहे. या यादीमध्ये ११ जणांचा समावेश आहे. वंचित बहुजन आघाडीने आधीच आठ उमेदवारांची घोषणा केली होती, त्यामुळे आता वंचितचे एकूण १९ उमेदवार झाले आहेत. वंचित बहुजन आघाडीने आणखी उमेदवार घोषित केल्यामुळे आता प्रकाश आंबेडकरांचा पक्ष महाविकासआघाडीत सहभागी होणार का? याबाबत साशंकता निर्माण झाली आहे.

## रावेरमध्ये संजय ब्राह्मणे मैदानात

**जळगाव :** रावेर लोकसभा मतदारसंघातून वंचित बहुजन आघाडीने भुसावळ येथील अभियंता संजय ब्राह्मणे यांना उमेदवारी घोषित केली आहे. लोकसभा निवडणुकीसाठी सर्वच पक्ष तयारीला लागले आहेत. महाविकास आघाडीशी बोलणी फिस्कटल्यानंतर वंचित बहुजन आघाडीने आपले उमेदवार जाहीर करणे सुरु केले आहे. वंचित बहुजन आघाडीने जाहीर केलेल्या उमेदवारांच्या दुसऱ्या यादीत रावेरमधून संजय ब्राह्मणे यांचा समावेश आहे. पक्षाचे प्रकाश आंबेडकर यांनी यासंदर्भातील घोषणा केली.

## चव्हाणांनी घेतला काढता पाय

**मुंबई :** माजी मुख्यमंत्री तथा भाजपचे नेते अशोक चव्हाण यांना मराठा आंदोलकांच्या रोषाचा सामना करावा लागला.



नांदेड लोकसभा मतदारसंघाचे भाजप उमेदवार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रचारासाठी गावात आलेल्या चव्हाण यांना मराठा आंदोलकांनी प्रचंड विरोध केला. तसेच चव्हाण यांना गावात येऊ देणार नसल्याची भूमिका घेतल्याने आंदोलकांचा रोष पाहता चव्हाण यांनी गावातून काढता पाय घेतला.

## आठवलेंची बोळवण

**कल्याण :** केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या आरपीआय पक्षाकडून शिर्डी लोकसभा मतदारसंघावर दावा करण्यात आला होता. मात्र, शिवसेना शिंदे गटाने या ठिकाणी खासदार सदाशिव लोखंडे यांना उमेदवारी दिली. त्यामुळे आठवले नाराज असल्याची चर्चा होती. दरम्यान, रामदास आठवलेंना केंद्रीय मंत्रीपद आणि राज्यात एक मंत्रीपद आणि विधान परिषदेची आमदारकी देण्याचे आश्वासन उपमुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्याचे रामदास आठवले यांनी सांगितले.

# जानकरांनी परभणीतून भरला अर्ज

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

महादेव जानकर यांनी सोमवारी (दि.१) परभणीतून लोकसभा निवडणुकीसाठी अर्ज दाखल केला. या निमित्ताने महायुतीकडून परभणीत सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पंकजा मुंडे उपस्थित होत्या.



या सभेत जानकरांनी परभणीच्या नागरिकांना महत्त्वाचं आवाहन केले. माझी कुठेही भानगड नाही, हा देह तुमच्यासाठी, परभणीत उमेदवारी अर्ज भरताच महादेव जानकर यांचे आश्वासन परभणीत उमेदवारी अर्ज भरताच महादेव जानकरांनी नागरिकांना दिले.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वर्षा बंगल्यावर गेल्या आठवड्यात पार पडलेल्या बैठकीत याबाबत निर्णय झाला होता. त्यावेळी जानकरांनी आपण महायुतीसोबतच असून आपल्याला एक जागा देण्यात आल्याचे म्हटले होते. जानकरांनी त्यावेळी फार बोलणे टाळले. पण त्यांनी परभणी मतदारसंघासाठी अर्ज भरल्यानंतर परभणीत महायुतीकडून भव्य कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात महादेन जानकर यांनी आपली सविस्तर भूमिका मांडली.

# श्रीकांत शिंदेंच्या विरोधात ठाकरे गटाचा उमेदवार ठरला

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे पुत्र आणि कल्याणचे विद्यमान खासदार श्रीकांत शिंदे यांच्या विरोधातील ठाकरे गटाचा उमेदवार निश्चित झाला आहे. ठाकरे गटाच्या नेत्या



अयोध्या पोळ यांना कल्याण लोकसभा मतदारसंघातून उमदवारी दिली असून, याबाबत स्वतः अयोध्या पोळ यांनी ट्वीट करत माहिती दिली आहे.

याबाबत आपल्या ट्वीटमध्ये अयोध्या पोळ यांनी म्हटले आहे की, आदरणीय पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या आशिर्वादाने मशाल चिन्हावर शिवसेनेकडून कल्याण लोकसभा लढवत आहे. ज्यांच्याकडे ईडी, आयटीसारखी ताकद आहे, असा स्वयंघोषित जागतिक स्तराचा सर्वात मोठा पक्षासोबत युतीत आहे, अशा मुख्यमंत्र्याच्या खासदार मुलाच्या विरोधात संधी दिल्याबद्दल आदरणीय साहेब, आदित्य ठाकरे, संजय राऊत, वरुण सरदेसाई, साईनाथ दुर्गे यांचे खुप खुप धन्यवाद.

ठाकरे गटाच्या नेत्या अयोध्या पोळ यांनी आपल्या अधिकृत ट्वीटर खात्यावरून कल्याणमधून आपल्याला उमेदवारी मिळाली असल्याची स्वतःच घोषणा केली आहे. मात्र, ठाकरे गट किंवा उद्धव ठाकरे यांच्याकडून याबाबत कोणतेही अधिकृत घोषणा करण्यात आलेली नाही.

### कोणाची ताकद जास्त?

**कल्याण लोकसभा मतदारसंघ शिवसेनेचा बालेकिल्ला समाजाला जातो. या मतदारसंघात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे याचं राजकीय वर्चस्व पाहायला मिळते. या मतदारसंघात एकूण ६ विधानसभा मतदारसंघ आहेत. ज्यात भाजपकडे तीन मतदारसंघ असून, शिवसेनेकडे एक मतदारसंघ आहे. तसेच एक मनसे आणि एक राष्ट्रवादीचा आमदार या मतदारसंघात आहे. विशेष म्हणजे शिवसेनेत झालेल्या बंडखोरीनंतर पहिल्यांदाच लोकसभा निवडणूक होत असल्याने या मतदारसंघात शिंदेंच्या सेनेची ताकद जास्त आहे की, ठाकरेंच्या सेनेची हे निवडणुकीच्या निकालानंतरच स्पष्ट होईल.**

# खा. गोडसेंचा पत्ता कट?

**। धाराशिव । वृत्तसंस्था ।**

नाशिक आणि धाराशिवच्या जागेबाबत महायुतीतील तिढा अखेर सुटण्याच्या मार्गावर आहे. शिवसेनेचे विद्यमान खासदार हेमंत गोडसे यांचा पत्ता कट होण्याची शक्यता आहे. कारण नाशिकची जागा राष्ट्रवादीला सुटणार असल्याची माहिती आहे. यासोबतच धाराशिव अर्थात उस्मानाबाद लोकसभाही अजित पवार यांच्या राष्ट्रवादीकडेच राहणार असल्याची शक्यता आहे.



नाशिक लोकसभा मतदारसंघातून ज्येष्ठ नेते छगन भुजबळ, तर धाराशिव लोकसभा मतदारसंघासाठी विधान परिषदेचे आ. विक्रम काळे यांच्या नावाची घोषणा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. धाराशिवमधून ठाकरे गटातर्फे विद्यमान खा. ओमराजे निंबाळकर यांना पुन्हा संधी देण्यात आली आहे. तर नाशिकमधून ठाकरेंनी राजाभाऊ वाजे यांना तिकीट दिलं आहे.

धाराशिववर महायुतीतील तिन्ही पक्षांनी दावा केल्यामुळे मोठा तिढा निर्माण झाला होता.

# भुजबळांच्या उमेदवारीला विरोध

**। नाशिक । वृत्तसंस्था ।**

लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज भरण्याची वेळ संपत आली. तरीही अद्याप अनेक ठिकाणी उमेदवार ठरत नसल्याचे दिसत आहे. महायुती असो की महाविकास आघाडी जागा वाटपाचा तिढा अजूनही कायम आहे. तर काही ठिकाणी उमेदवार स्थानिक कार्यकर्ते उमेदवाराला विरोध करत आहेत.



नाशिक लोकसभा मतदार संघातून महायुतीतर्फे मंत्री छगन भुजबळ यांच्या नावाची जोरदार चर्चा आहे. मात्र, छगन भुजबळ यांच्या नाशिकमधून लढण्याला कार्यकर्त्यांनी विरोध दर्शवला आहे.

मंत्री छगन भुजबळ यांनी लोकसभा निवडणूक लढविण्यास त्यांचा मतदार संघ असलेल्या येवल्यातील राष्ट्रवादी काँग्रेस, समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी विरोध केला आहे. भुजबळ यांनी येवल्याचेच प्रतिनिधित्व करण्याच्या भावना कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत. नाशिक लोकसभा मतदार संघातून महायुतीतर्फे मंत्री छगन भुजबळ यांच्या नाव आघाडीवर आहे.

मात्र, भुजबळ यांनी लोकसभा निवडणूक लढविण्यास त्यांचा मतदार संघ असलेल्या येवल्यातील राष्ट्रवादी काँग्रेस, समता परिषदेच्या कार्यकर्त्यांनी विरोध केला आहे. भुजबळ गेल्या २० वर्षांपासून येवल्याचे प्रतिनिधित्व करीत असून पुढे ही त्यांनी येवल्याचे प्रतिनिधित्व करावे अशा भावना भुजबळ समर्थकांनी व्यक्त केल्या आहे.

# 'ठाण्यात चिन्ह तुमचे, उमेदवार आमचा'

**। डोंबिवली । वृत्तसंस्था ।**

महायुतीत जागा वाटपात ठाणे व कल्याणच्या जागेचा तिढा अद्याप सुटलेला नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासाठी प्रतिष्ठेच्या असलेल्या ठाणे मतदारसंघावर भाजपने आपला दावा कायम ठेवला आहे. ठाण्याची जागा मिळावी, यासाठी भाजपने कल्याणमध्ये शिंदे यांची कोंडी केल्याची चर्चा आहे. मंत्री रवींद्र चव्हाण यांनीदेखील आमच्या सहकार्याशिवाय पर्याय नसल्याचे म्हणत अप्रत्यक्षरीत्या आपली ताकद दाखवून देण्याचा प्रयत्न केल्याचा राजकीय जाणकारांचे म्हणणे आहे. ठाण्यात चिन्ह तुमचे उमेदवार आमचा असा प्रस्तावदेखील भाजपने सेनेपुढे ठेवल्याची चर्चा आहे. अद्याप निश्चित करता आलेला नाही. मात्र मुख्यमंत्र्यांचा बालेकिल्ला असलेल्या ठाणे, पालघर, कल्याण या मतदारसंघातील चित्र अजूनही स्पष्ट झालेले नसल्याने शिंदे समर्थकांमध्ये अस्वस्थता पसरली आहे. ठाणे मतदारसंघावर भाजपचे गणेश नाईक यांचे पुत्र माजी खा. संजीव नाईक यांच्यासाठी भाजपने या जागेवर दावा केला आहे. ही जागा मुख्यमंत्र्यांना सोडावी लागली तरी दोघांच्या सहमतीचा उमेदवार म्हणून नाईक यांनी धनुष्यबाण चिन्हावर ही निवडणूक लढवावी, असा प्रस्तावदेखील भाजपने शिंदे यांच्यासमोर मांडला आहे.

# राणांविरोधात महायुतीत कुरघोडी

**। अमरावती । वृत्तसंस्था ।**

नवनीत राणा यांना उमेदवारी मिळाल्यानंतर अमरावतीतल्या महायुतीतले वाद समोर यायला लागले. शिवसेना नेते आनंदराव अडसूळ यांनी आधीपासूनच राणांचा प्रचार करणार नसल्याची भूमिका घेतली. तर प्रहार संघटनेचे आ. बच्चू कडू यांनीही अमरावतीतून उमेदवार उतरवण्याची घोषणा केली आहे. राणा यांच्याविरुद्ध दिनेश बुब उमेदवार असतील अशी घोषणा प्रहार संघटनेने केली. त्यातच संजय खोडके यांनीही राणा यांना आव्हान दिलं आहे.



अमरावती लोकसभा निवडणुकीच्या आपल्या प्रचाराच्या पोस्टरवर आपण माझा फोटो लावला असल्याचे मला समजले असून सोशल मीडियावर सुद्धा वायरल केला जात आहे. सोशल मीडियावर किंवा पोस्टरवर माझा फोटो लावण्याची मला काहीही कल्पना नसून आपण माझा फोटो सोशल मीडियावर किंवा पोस्टरवर वापरण्याबाबत माझी व्यक्तिगत अनुमती सुद्धा घेतलेली नाही. हि बाब निवडणूक आदर्श आंचार संहितेचे उल्लंघन करणारी आहे. करिता आपणास विनंती आहे की, लोकसभा निवडणुकीत माझ्या फोटोचा व नावाचा वापर करू नये, आपण माझ्या फोटोचा वापर ज्या-ज्या मीडियात केलेला आहे तेथून त्वरित काढून मीडियामध्ये त्या संदर्भात आपण आपले निवेदन सोशल मीडिया व प्रिंट मीडियामध्ये करावे. नाही तर मला कायदेशीर कारवाई करणे भाग पडेल,फ असा इशारा संजय खोडके यांनी नवनीत राणांना दिला आहे.

## दिर-भावजय लढत

**। पुणे । वृत्तसंस्था ।**

धाराशिवमध्ये महायुतीच्या उमेदवाराचा तिढा अखेर सुटला आहे. महायुतीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसला धाराशिवची जागा मिळाली आहे. मात्र, या जागेवरुन भाजप आमदाराची पत्नी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढणार आहे. धाराशिवमध्ये आ. राणा जगजितसिंह पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील यांना उमेदवारी मिळणार असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे धाराशिवमध्ये राष्ट्रवादीत हा मोठा पक्षप्रवेश होणार आहे. भाजप आ. पाटील यांच्या पत्नी अर्चना पाटील या राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करणार आहेत. अशातच पारंपरिक प्रतिस्पर्धी असलेले निंबाळकर आणि पाटील कुटंबियांमध्ये सामना रंगणार आहे.

# सुजय विखेंसमोर निलेश लंकेंचे आव्हान

**। अहमदनगर । वृत्तसंस्था ।**

कधीकाळी काँग्रेसचा बालेकिल्ला अशी अहमदनगरची ओळख होती. मात्र, गेल्या तीन निवडणुकांमध्ये इथं भाजपने भगवा झेंडा रोवण्यात यश मिळवल आहे. २००९ मध्ये भाजपचे दिलीप गांधी यांनी राष्ट्रवादीच्या शिवाजी कर्डिलेंचा ४६ हजार मतांनी पराभव केला. २०१४ मध्ये त्यांनी राष्ट्रवादीच्या राजीव राजळेंना २ लाख मतांनी पराभूत केले. २०१९ मध्ये भाजपने राधाकृष्ण विखे पाटलांचे चिरंजीव सुजय विखे पाटलांना मैदानात उतरवले. त्यांनी राष्ट्रवादीच्या संग्राम जगतापांना तब्बल पावणे तीन लाख मतांनी हरवले. विधानसभेचा विचार केला तर सध्या राष्ट्रवादीचे चार आणि भाजपचे दोन आमदार आहेत.



यंदा भाजपनं पुन्हा एकदा डॉ. सुजय विखे पाटलांना उमेदवारी दिली आहे. तर आमदारकीचा राजीनामा देऊन निलेश लंके राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने लोकसभेच्या रणांगणात उतरणार आहेत. लंकेंचा तगडा जनसंपर्क पाहता विखे विरुद्ध लंके अशी जोरदार काँटे की टक्कर इथं रंगणार आहे.

सगेसोयरे आणि सोय-याधाय-यांचे राजकारण, हे नगरच्या राजकारणातलं प्रमुख वैशिष्ट्ये आहे. इथं विखे विरुद्ध थोरात असा उभा राजकीय संघर्ष आहे. या संघर्षात थोरातांचे नातेवाईक असलेले राजळे, त्यांचे नातेवाईक असलेले गडाख, कर्डिलेंचे जावई असलेले संग्राम जगताप आणि संदीप कोतकर नेमकी काय भूमिका घेतात, यावर निवडणुकीचा निकाल अवलंबून असणार आहे.

# सुप्रिया सुळेंचे व्हॉट्सअप स्टेटस चर्चेत

## पवारांच्या फोटोंना दिलेल्या कॅप्शनने वेधले लक्ष

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

बारामती मतदारसंघामध्ये नणंद-भावजय असा थेट संघर्ष पवार कुटुंबातील सदस्यांमध्येच होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. शरद पवार गटाकडून विद्यमान खा. सुप्रिया सुळे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. तर याच मतदारसंघातून महायुतीकडून अजित पवार यांच्या पत्नी सुनेत्रा पवार यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. बारामतीमध्ये दोन्ही बाजूने जोरादर प्रचाराला सुरुवात झाली आहे. शरद पवार राष्ट्रीय स्तरावरील इंडिया आघाडीसंदर्भातील कार्यक्रमांना हजेरी लावण्यापासून ते वेगवेगळ्या मतदारसंघांचे



दौरे करुन उमेदवार कोण असावा यासंदर्भातील चाचपण्या करत आहेत. असे असतानाच आता सुप्रिया सुळेंनी त्यांच्या व्हॉट्सअप स्टेटसला ठेवलेला एक व्हिडीओ चर्चेचा विषय ठरत आहे.

सुप्रिया सुळे यांनी आपल्या व्हॉट्सअप स्टेटसला शरद पवार यांच्या समर्थकांकडून व्हायरल केला जाणारा एक व्हिडीओ पोस्ट केला आहे. या व्हिडीओमध्ये शरद पवारांचे २ फोटो दिसत आहेत. यापैकी डवीकडील फोटो हा पक्षामध्ये फूट पडून अजित पवार आणि समर्थक आमदार दूर गेल्यानंतर झालेल्या शरद पवारांच्या पत्रकार परिषदेमधील आहे. तुमच्या पक्षाचा आश्वासक चेहरा कोण? असा प्रश्न शरद पवारांना विचारण्यात आला होता. त्यावर त्यांनी स्वतः हातवर करत मी असं हसत उत्तर दिले. वापरण्यात आला आहे.

### कॉलर उडवणारा

**शुक्रवारी साताऱ्यात पार पडलेल्या पत्रकार परिषदेतील आहे. उदयनराजे भोसले तिकीट मागायला आल्यास तुमच्या पक्षाकडून तिकीट देणार का? या प्रश्नावर शरद पवारांनी अशी काही शक्यता नाही असे उत्तर दिले. त्यानंतर अन्य एका पत्रकारने तुम्ही उदयनराजेंप्रमाणे कॉलर उडवणार का? असा प्रश्न विचारला असता पवारांनी पत्रकार परिषदेमध्येच दोन्ही हातांनी आपली कॉलर उडवून दाखवली.**

# सांगलीच्या जागेवरून काँग्रेसची नाराजी

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**



ठाकरे गटाने आपली उमेदवार यादी जाहीर केली. यात सांगलीतून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. यावर स्थानिक काँग्रेस नेत्यांमध्ये नाराजी पाहायला मिळाली. सांगलीतील काँग्रेसच्या नेत्यांनी दिल्लीत जात आपली नाराजी बोलून दाखवली. या सगळ्याचे कोल्हापूर मतदारसंघातही पडसाद उमटत असल्याची राजकीय वर्तुळात होत आहे. यावर काँग्रेसचे वरिष्ठ नेते, सतेज पाटील यांनी प्रतिक्रिया दिली आहे.

सांगलीच्या जागेचे पडसाद कोल्हापूरमध्ये नाहीत. कोल्हापूरमध्ये शिवसेना ताकतीने काम करत आहे. उद्धव ठाकरे देखील शाहू महाराजांकडे येऊन गेले. मधल्या काळात भाजपच्या माध्यमातून काही अफवा पसरवल्या गेल्या. सांगलीबाबत वरिष्ठ पातळीकडून आम्ही अजूनही आशावादी आहोत, असं सतेज पाटील म्हणाले.

**निवडक**

## उष्म्यामुळे सारेच हैराण

**खांब :** मार्च महिन्याच्या शेवटी उष्णतेच्या प्रमाणात चांगलीच वाढ झालेली असेल, असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता. तर, दिवसेंदिवस वाढत चाललेल्या उष्णतेमुळे त्यांचे प्रत्यंतर साऱ्यांनाच येऊ लागल्याने सर्वच हैराण झाले आहेत. उष्णतेपासून गारवा मिळावा म्हणून गुरेसुद्धा झाडाच्या सावलीखाली विसावत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मार्च महिन्याच्या शेवटी शेवटी परिस्थिती पूर्णपणे बदलली व वातावरणात एकाकी उष्णतेचे प्रमाणात वाढ होऊ लागली आहे.

## महापुरूषांची कमान

**पाली :** सुधागड तालुक्यातील वसुधा सोसायटीने विडसईकडे जाणाऱ्या सार्वजनिक रहदारीच्या रस्त्यावर सुशोभीकरणकरून प्रवेशद्वार उभारले आहे. या प्रवेशद्वारावर भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून विडसई बौद्धवाडी ग्रामस्थ व ऑल इंडिया पँथर सेनेने छत्रपती शिवाजी महाराज, फुले, शाहू, आंबेडकर या बहुजन महापुरुषांची कमान थाटली होती. ही कमान उंच, सुरक्षित व कायमस्वरूपी राहावी, अशी मागणी पँथर सेनेने केली होती. त्यांच्या या लढ्याला यश आलेले आहे.

## हरिनाम सप्ताहाची सांगता

**तळा :** मुंढ्याची वाडी येथे पाच दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह या सोहळ्यामुळे भाविकांना अध्यात्माची ओळख होते. १९६४ साली मुंढ्याची वाडी येथे ज्ञानेश्वर महाराजांच्या मंदिराची स्थापना करून गावात वारकरी संप्रदायाची मुहूर्तमेढ रोवली. तेव्हापासून सुरुवात केलेल्या अखंड हरिनाम सप्ताहाची परंपरा आज अठ्ठावन वर्षानंतरही कायम आहे. सोमवारी (दि.१) ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी मिरवणुकीने अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता झाली.

## अश्वारूढ पुतळ्याची उभारणी

**पनवेल :** स्व.प्रतिक जयंत भोईर यांच्या स्मरणार्थ प्रतिक जयंत भोईर मेमोरियल फाउंडेशन व मे. सुरज इंटरप्राईजेस पळस्पे तसेच डॉ.जयंत भोईर व चंद्रकांत भोईर यांच्याकडून पनवेल तालुक्यातील पळस्पे ग्रामपंचायतीच्या आवारात छ.शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याची उभारणी करण्यात आली. याप्रसंगी भोईर कुटुंबीय, पळस्पे ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी पळस्पेतील शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानतर्फे ढोल ताशा पथक, भव्य लाईट शो, सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

## इफ्तार पार्टीचे आयोजन

**खांब :** फिरोज टॉकीज जवळील हजरत पीर गाझी शेख सलाऊद्दीन बाबा रिक्षा स्टॅण्डच्यावतीने पवित्र रमजान निमित्त इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. इफ्तार पार्टी मोठ्या उत्साहात पार पडली असून या इफ्तार पार्टीच्या निमित्ताने हिंदू-मुस्लिम बांधव एक्याचे दर्शन दिसून आले. सायंकाळी मगरीबच्या नमाजाकरिता बांग होताच मुस्लिम समाज बांधवांनी खजूर खाऊन आपला उपवास सोडला. तर, उपस्थित हिंदू समाज बांधवांनी मुस्लिम समाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

# नोटरींवर प्रश्नचिन्ह

## तहसीलमधील प्रतिज्ञा पत्राचीच सक्ती; नागरिकांची गैरसोय

**। सुधागड-पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील एकमेव पाली नगरपंचायत कोणत्या ना कोणत्या गोष्टीने सतत चर्चेत राहणारी ही नगरपंचायत म्हणून प्रसिद्ध आहे. असेच एका घटनेने पाली नगरपंचायत पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. कारण, विविध कामांसाठी नगरपंचायतीकडून पब्लिक नोटरी न स्वीकारता केवळ तहसील कार्यालयातून प्रतिज्ञापत्र बनवण्याची मागणी केली जात आहे. यामुळे नागरिकांना प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास होत आहे. शिवाय, वेळेचा अपव्यय होऊन आर्थिक भुर्दंड बसत आहे.

यासंदर्भात सविस्तर माहिती अशी की, पाली येथील ॲड. नोएल चिंचोलकर यांनी नगरपंचायतीमध्ये आपल्या मुलाच्या विवाह नोंदणीकरिता अर्ज केला होता. पाली नगरपंचायतीने ॲड. चिंचोलकर यांच्याकडे त्यांच्या मुलाच्या विवाहाच्या नोंदणीकरिता त्यांचा मुलगा व त्याची पत्नी यांचे संयुक्त प्रतिज्ञापत्र मागितले होते. परंतु, सदरचे प्रतिज्ञापत्र हा फक्त तहसील कार्यालयातूनच नोंदणी करून




देण्याची सक्ती पाली नगरपंचायत अधिकारी यांच्याकडून केली जात आहे. चिंचोलकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना प्रतिज्ञापत्र मे. पब्लिक नोटरी यांच्यासमोर करून देतो असे सांगितले असता संबंधित अधिकाऱ्यांनी चिंचोलकर यांना नोटरी करून आणलेला प्रतिज्ञापत्र आमच्याकडे स्वीकारले जाणार नाही, असे सांगितले. यावेळी चिंचोलकर यांनी संबंधित अधिकारी यांना विचारणा करून तसा शासन निर्णय अथवा पत्रक दाखवण्याची विनंती केली. या प्रकरणामध्ये एक गोष्ट मात्र नक्की आहे की, पाली नगरपंचायतीचे अधिकारी अलिखित कायद्याची सक्ती करताना दिसत आहेत.

> सर्वच सरकारी कामांमध्ये पब्लिक नोटरी स्वीकारले जातात. मग पाली नगरपंचायतीमार्फत तहसील कार्यालयातील नोंदणीकृत प्रतिज्ञापत्राबाबत सक्ती का करण्यात येत आहे. याबाबत वरिष्ठ कार्यलयाकडे तक्रार दाखल करणार आहे.
> - ॲड. नोएल चिंचोलकर, पाली

> संबंधितांकडून आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता केल्यावर विवाह नोंद करण्यात येईल.
> - विद्या येरूणकर, मुख्याधिकारी, पाली नगरपंचायत

केंद्र व महाराष्ट्र राज्य शासन यांनी नेमलेले नोटरी यांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उत्पन्न करीत आहेत. शिवाय, तहसील कार्यालयातून प्रतिज्ञापत्र करणे म्हणजे वेळ व पैशाचा अपव्यय आहे. नोटरी शासकीय नियमाप्रमाणे असल्याने ती नाकारणे म्हणजे शासनाला आवाहन करण्यासारखे आहे. याबाबत पाली नगरपंचायत त्यांच्या अलिखित नियमांबाबत काय निर्णय घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## नैनिता कर्णिक यांना जीवनगौरव पुरस्कार

**। कोर्लई । वार्ताहर ।**

मनुष्यबळ विकास लोकसेवा अकादमीतर्फे पुणे येथे गुणीजन गौरव पुरस्कार प्रदान समारंभ आयोजित करण्यात आला. यामध्ये राज्यस्तरीय नारीशक्ती सन्मान नारीगौरव पुरस्कार-२०२४ वितरण सोहळा सांस्कृतिक सभागृहात घेण्यात आला. दरम्यान, मुरुडमधील प्राथमिक शाळेच्या माजी मुख्याध्यापिका नैनिता नयन कर्णिक यांना राज्यस्तरीय गुणीजनरत्न जीवन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. याबद्दल सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे.



या कार्यक्रमाप्रसंगी संमेलन समारंभाध्यक्ष साहित्यिक विचारवंत डॉ. सुनील सावंत, मार्गदर्शक प्रमुख पाहुणे शामसुंदर सोन्नर महाराज, विशेष पाहुणे शिक्षणतज्ज्ञ मेघा पांडे, इंटरनॅशनल टॅलेन्ट आयकॉन महासमन्वयक नारायण वाणी, समारंभ संयोजक रवींद्र कापसे उपस्थित होते. सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन व सरस्वती पूजन करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माजी मुख्याध्यापिका नैनिता कर्णिक यांना त्यांच्या सामाजिककार्य, राज्यस्तरीय लेखन स्पर्धेत चारोळी स्पर्धा, काव्यलेखन स्पर्धा यात मिळवलेल्या यशाबद्दल मानाचा फेटा, मानकरी बॅच, महावस्त्र, गौरव पदक, सन्मानचिन्ह आणि मानपत्र स्वरूपात राज्यस्तरीय गुणीजनरत्न जीवन गौरव पुरस्कार प्रदान करुन सन्मानित करण्यात आले.

## घरपट्टी, पाणीपट्टी तात्काळ भरावी

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड नगरपरिषदेकडून नागरिकांनी घरपट्टी व पाणीपट्टी तात्काळ भरुन प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आतापर्यंत ४८ टक्के लोकांनी घरपट्टी भरली असून, उर्वरित नागरिकांनी मार्च महिन्याच्या आत ती भरणे क्रमप्राप्त आहे. यासाठी नगरपरिषदेकडून जनजागृती करण्यात येत आहे.

मुरुड शहराची लोकसंख्या १२ हजारांच्या आसपास असून, येथे घरपट्टी व पाणीपट्टी भरण्याचा सरासरी वार्षिक आकडा ९० टक्केच्या आसपास आहे. सध्या नगरपरिषदेने वसुली मोठ्या प्रमाणात होण्यासाठी जनजगृतीबरोबरच कर्मचारी स्वतः लोकांच्या घरी पोहोचत असून, नागरिकांना घरपट्टी व पाणीपट्टी भरण्याचे आवाहन करीत आहेत.

## माथेरान घाटात जाळ्या लावल्या, गटारे स्वच्छ कधी?

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेरळ-माथेरान घाटात दरडी कोसळण्याच्या ठिकाणी लोखंडी जाळ्या बसविण्यात आली आहेत. मात्र, घाट रस्ता सुस्थितीत राहावा यासाठी गटारे स्वच्छ करण्याची कामे गेली दोन वर्षे झालेली नाहीत. त्याबद्दल माथेरानच्या माजी नगराध्यक्ष प्रेरणा सावंत यांनी नाराजी व्यक्त केली. त्यानंतर घाट रस्त्यावरील सर्व गटारे पावसाळ्याआधी स्वच्छ केली जातील, असे आश्वासन सार्वजनिक बांधकाम खात्याने दिले आहे.

माथेरानमध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणकडून माथेरान घाट रस्त्याचे काम झाल्यानंतर ते सार्वजनिक बांधकाम विभागाकडे सुपूर्द केले. रस्त्याची देखभाल करणे आवश्यक असतानादेखील पावसाळ्यात दरड कोसळते, त्यावर



प्रतिबंधक उपाय म्हणून व्हीजेटीआयमार्फत सर्व्हे केला. टेंडर प्रक्रिया जवळपास दोन वर्षे चालली. नंतर जाळी बसवली. ती खरंच ह्या दगडांच्या मुखवट्याला धरून ठेवण्यास पूरक आहे का? रस्त्यावर जे खड्डे बुजवण्याचे काम करतात तेही तकलादू असते, असे रोज प्रवास करणाऱ्या टॅक्सी चालक आणि नागरिकांचं ठाम मत आहे.

घाट रस्त्यावर, दरीत टाकल्या जाणाऱ्या प्लास्टिक कचऱ्यावरसुद्धा नियंत्रण ठेवण्यासाठी उपाय होणे गरजेचे आहे. यासाठी कापडी पिशवी चा वापर, पर्यावरण संवर्धन आणि वन संवर्धन/संरक्षण ही जाणीव प्रत्येकाने ठेवली पाहिजे. त्यासाठी घाट रस्ता सुरू होतो तिथे बॅरिकेट्स लावण्यात यावेत, अशी मागणी होत आहे. तरी, माथेरान पर्यावरण पूरक झोनमधून निर्णय व्हावा, अशी अपेक्षा आहे.



मुरूड शहराला जसा सुंदर समुद्रकिनारा आहे तसेच प्रत्येक घरामागे नारळ सुपारीची बाग आहे. मुरूड शहर हे माडाच्या बनात लपलेले म्हणजेच नारळाच्या झाडांमध्ये वसलले शहर आहे. हा मनमोहक देखावा पर्यटकांना टेकडीवरील दत्त मंदिरावरून पाहता येतो. (छायाचित्र : सुधीर नाझरे)



## कृषी संशोधन केंद्रात सेवानिवृत्तांचा सत्कार

**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त राहिलेल्या सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार कार्यक्रम येथील सह्याद्री अतिथी गृह सभागृहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहयोगी संशोधन संचालक डॉ. शिवराम भगत होते. व्यासपीठावर भात विशेषज्ञ डॉ.भरत वाघमोडे, अधिदान व लेखा अधिकारी प्रदीप कदम उपस्थित होते .

अध्यक्षीय मार्गदर्शन करताना डॉ. भगत म्हणाले की, सेवानिवृत्त कर्मचारी आणि अधिकारी यांच्याप्रति कृतज्ञता म्हणून ऋणनिर्देश करणे, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. प्रादेशिक कृषी संशोधन केंद्राची कामगिरी आंतरराष्ट्रीय पातळीवर गौरविण्यात येत असून, त्यात सेवानिवृत्त कर्मचारी, अधिकाऱ्यांचे मौलिक योगदान आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

डॉ. वाघमोडे म्हणाले की, सेवानिवृत्त व्यक्तींचा सत्कार करणे, हा स्तुत्य उपक्रम आहे.संशोधन केंद्राने विकसित व शिफारशीत केलेल्या विविध भात वाणांत मजूर वर्गाचाही वाटा आहे. यावेळी डॉ.पी.आर. चौधरी, डॉ. ए.एस. दळवी, आर.के. कळंबे, ए.सी. सरपोतदार, प्रदीप कदम यांची समयोजित भाषणे झाली. याप्रसंगी १०२ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले.

तसेच, सेवानिवृत्तीनंतर निधन झालेल्या कर्मचाऱ्यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर.सी. वेटकोळी, किशोर सातकर, दिलीप पाटील, लहू आसोलकर, योगेश आमरे, जितेंद्र कडू, अंगद निर्मळ यांनी परिश्रम घेतले.

## भेरव शाळेचा शताब्दी महोत्सव

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळा भेरवचा शताब्दी महोत्सव रविवारी (दि.३१) मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन अतिष सागळे, रमेश सागळे, अमर सागळे, रूपेश मोरे, काशिनाथ सागळे, संदीप सागळे, सुधीर सागळे, सुधीर नेमाणे, शाळा व्यवस्थापन समिती भारती सागळे, मुख्याध्यापक रश्मी लखीमले, शिक्षिका जान्हवी दंत तसेच आजी-माजी विद्यार्थी व विद्यार्थिनी, ग्रामस्थ मंडळ भेरव यांनी केले होते. या कार्यक्रमासाठी भेरव, वाफेघर, खुरावले, चिवे, आवंढे, वाघोशी, कुंभारघर, कवेले, तोरणपाडा, खांडपोली व कामथेकरवाडी या गावातील आजी व माजी विद्यार्थी व जेष्ठ नागरिक उपस्थित होते. 'माझे गाव माझा अभिमान',



'माझी शाळा माझा स्वाभिमान' हे ब्रीद शताब्दी महोत्सवावेळी सर्वांनी प्रत्यक्षात आणले.

यावेळी उपस्थित ज्येष्ठ नागिकांचा सन्मानचिन्हे देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. विद्यार्थी व विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमातून आपल्या कला सादर करून उपस्थित मान्यवरांचे मनोरंजन केले. या कार्यक्रमाला सहायक पोलीस निरीक्षक श्री. बालवाडकर, ज्येष्ठ नागरिक अर्जुन सागळे, केंद्रप्रमुख रासळ राजेश गायकवाड, दिपक पवार, उद्योजक संजय सागळे, रमेश सागळे, उद्योजक व पाली नगरपालिकेचे नगरसेवक पराग मेहता, सर्व ज्येष्ठ शिक्षक, पत्रकार अमित गायकवाड, सतीश देशमुख, मुख्याध्यापिका रश्मी लखिमळे, व्यवस्थापक शाळा कमिटी भैरव आदींसह विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक राजेश गायकवाड यांनी केले.

## मतदान जनजागृतीसाठी प्रांतांची मोटारसायकल रॅली

**। म्हसळा । वार्ताहर ।**

आगामी लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने मतदार जनजागृती मोटारसायलक रॅली प्रांताधिकारी महेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली म्हसळा येथे काढण्यात आली. १८ वर्षांवरील सर्व मतदारांनी मतदानाचा हक्क बजावून लोकशाही मजबूत करण्याचे आवाहन प्रांत महेश पाटील यांनी केले. सईद अहमद कादिरी यांच्या हिंदुस्थान पेट्रोलिम पंपापासून या बाईक रॅलीला सुरुवात झाली.

याप्रसंगी प्रांत महेश पाटील यांच्यासमवेत तहसीलदार समीर घारे, मुख्याधिकारी विठ्ठल राठोड, महसूल तहसीलदार धर्मराज पाटील, श्रीवर्धन नायब तहसीलदार केमनाईक, निवासी नायब तहसीलदार गणेश तेलंगे, सईद अहमद कादिरी, मंडळ अधिकारी सलीम शहा, म्हसळा तलाठी गोरख माने, तालुक्यातील तलाठी, महसूल कर्मचारी आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी पेट्रोल भरावयास येणाऱ्या प्रत्येक ग्राहकांशी संवाद साधण्याचा प्रयत्न प्रांत महेश पाटील यांनी करून आगामी लोकसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढवून ८५ टक्क्यांपेक्षा जास्त मतदान करून म्हसळा तालुक्याने रेकॉर्ड ब्रेक करून प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी केले.



**क्लासिफाईड**
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- चेंढरे अलिबाग येथे बंगला with Terrace भाड्याने देणे आहे. बंगला १००० चौरस फूट. मागे २००० चौरस फूट लॉन, नारळाची झाडे. इच्छुक भाडेकरूंनी संपर्क साधावा ९८६७२१४६१६

- मांडवा जेट्टी येथील घर व घराच्या आजूबाजूचा परिसर साफ सफाई करण्यासाठी पुरुष/मुलगा पाहिजे.मासिक पगार रुपये ८०००/- ते १००००/- वयाची अट नाही. संपर्क : ८६९८६८२१२१

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पात विघ्ने

## महिन्यानंतरही काम संथगतीने

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**माथेरान शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी मलनिःसारण प्रकल्प मंजूर झाला आहे. या प्रकल्पाचे कामाला विघ्ने आली असून, महिन्यानंतर प्रकल्पाचे काम सुरु झाले पण ते काम संथगतीने सुरू आहे. माथेरानमध्ये पिण्याच्या पाण्याला महत्त्व देण्यात आल्याने सिमेंट कामे बंद करावी लागत असून, त्याचा फटका मलनिःसारण प्रकल्पालादेखील बसला आहे.**

राज्य मानव हक्क आयोग यांच्या आदेशाने माथेरान शहरात मलनिःसारण प्रकल्प मंजूर झाला आहे. शहरातील सांडपाणी दरीमध्ये जाऊन परिसरात प्रदूषण होऊ नये यासाठी माथेरान शहरातील सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी प्रकल्प मंजूर आहे. ५० कोटी खर्चाच्या या प्रकल्पाचे काम सुरू असून, ठेकेदार आणि सल्लागार कंपनी ही आपली जबाबदारी टाळून काम करीत असल्याने प्रकल्पाचे काम पालिकेने थांबवून ठेवले होते. त्यानंतर तब्बल महिन्याने सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. मात्र, नव्याने कामे करताना सिमेंट बांधकाम असलेली कामे सुरू करण्यात आली. त्यात चेंबर आणि पाईप लाईनच्या खाली सिमेंट पीसीसी करण्यात येऊ लागली होती. मात्र, पर्यटनस्थळ असलेल्या माथेरानमध्ये पर्यटकांसाठी पाण्याची मूलभूत गरज लक्षात घेऊन पिण्याच्या पाण्याला प्राधान्य देण्यात आले आहे.

माथेरान शहरात बाहेरून ट्रँकरने पाणीपुरवठा करण्यात येऊ शकत नाही. वाहनांना बंदी असल्याने पाणी कुठून आणायचे, असा मोठा प्रश्न सिमेंट बांधकाम करताना पालिका आणि ठेकेदार यांना पडला आहे. त्यामुळे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्पाचे काम संथगतीने सुरू आहे. माथेरान शहरात काही मोठ्या विहिरी असून, त्या विहिरी बंद आहेत. अशा विहिरींमधील पाणी उचलून ते वापरता येऊ शकते आणि त्यासाठी संबंधित विहीर मालकांची परवानगी महत्त्वाची आहे. हे लक्षात घेऊन वायफळ पाणी बचतीवर कटाक्ष टाकून बांधकाम वापरास पाणी उपलब्ध करण्यावर बंधने आली आहेत. त्यामुळे पाण्याआभावी माथेरानमधील सांडपाणी प्रकल्पामधील सिमेंट कामे ठप्प झाली आहेत.



# कर्जतमध्ये आचारसंहितेची ऐशीतैशी

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

**कर्जत शहरात प्रमुख राजकीय पक्षांची मुख्य कार्यालये आहेत. शहरात चार प्रमुख पक्षांनी आपल्या कार्यालयांवरील पक्षीय बॅनर अद्याप काढले नाहीत. १६ मार्चपासून देशात आदर्श आचारसंहिता लागू आहे. दरम्यान, कर्जत विधानसभा मतदारसंघाचे लोकसभा निवडणुकीकरिता असलेले सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय याच कर्जत शहरात आहे आणि असे असताना आचारसंहितेची ऐशीतैशी खुलेआम सुरू आहे.**

## नेत्यांच्या कार्यालयांवरील बॅनर जसेच्या तसे



देशात आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, सरकारी जाहिरातींना बंदी घालण्यात आली आहे. तर राजकीय पक्षांचे, त्यांच्या नेत्यांचे पदाधिकारी यांच्या बॅनरवर पांढरे कपडे लावले जात आहेत. सरकारी विकासकामांच्या पाट्यांवरदेखील पांढरे पट्टे करण्यात आले असून, त्याला कर्जत तालुक्यातदेखील अपवाद नाही. मात्र, राजकीय पक्षांची कार्यालये कर्जत तालुक्यात निवडणूक विभागाच्या आदर्श आचारसंहितेपासून मोकळी आहेत. कर्जत शहरात या मतदारसंघाचे आमदार महेंद्र थोरवे यांचे जनसंपर्क कार्यालय आहे. त्या कार्यालयावर राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह विद्यमान आमदार यांची छायाचित्रे आणि शिवसेना पक्षाचे निवडणूक चिन्ह आहे. ते सर्व बॅनर आजही तसेच असून, या कार्यालयावर राज्य निवडणूक आयोग आणि केंद्रीय निवडणूक आयोग यांचे लक्ष गेलेले नाही. शिवसेना कार्यालयापासून १०० मीटर अंतरावर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्यालय आहे. तेथे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेश अध्यक्ष सुनील तटकरे तसेच रायगड जिल्ह्याचे नेते सुधाकर घारे यांच्या तसबिरीसह पक्षाचे निवडणूक चिन्ह असलेले घड्याळ अजूनही तसेच बिनदिक्कतपणे सताड उघडे असून, खुलेआम प्रचार सुरू आहे. कर्जत शहरात भारतीय जनता पक्षाचे जनसंपर्क कार्यालय असून, तेथेदेखील देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी तसेच भाजप नेत्यांचे फोटो असून, कमळ हे निवडणूक चिन्हदेखील झाकून ठेवण्यात आलेले नाही.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार आणि राष्ट्रीय काँग्रेस यांच्या पक्षांची नेरळ येथे असलेली कार्यालये झाकून ठेवली आहेत. मात्र, महाराष्ट्र नवनिर्माण सेना यांचे कर्जत नेरळ रस्त्यावर असलेले जिल्हाध्यक्षांच्या पक्ष कार्यालयावरील बॅनर कायम आहेत. तर कर्जत शहरातील वंचित बहुजन आघाडीच्या कार्यालयावरील बॅनर झाकून ठेवण्यात आले आहेत. याच कर्जत शहरात निवडणूक आयोगाचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय आहे.

मात्र, त्या कार्यालयाकडून कर्जत शहरातील राजकीय पक्षांच्या पक्ष कार्यालय येथील बॅनरवर कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेली नाही. राजकीय दबावापोटी सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय काम करीत आहे, अशी चर्चा कर्जत तालुक्यात सुरू असून, त्यांची कार्यालयावर बॅनर आहेत तर मग आम्ही कशाला काढायचे, असे राजकीय पक्ष बोलत असून, कर्जत नगरपरिषद निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे कारवाई करीत नसल्याबद्दल आश्चर्य व्यक्त होत आहे.

# कत्तलीसाठी आणलेल्या जनावरांची सुटका

**। पनवेल । वार्ताहर ।**

शासनाच्या कोणत्याही वैध परवानगीशिवाय जनावरांना क्रूरतापूर्वक वागणूक करून कत्तल करण्याच्या उद्देशाने घेऊन जाणाऱ्या १२ जनावरांना तळोजा पोलिसांनी आयशर कंपनीच्या टेम्पोसह ताब्यात घेतले असून, याबाबत चार जणांवर कारवाई केली आहे.

तळोजा देना बँकेसमोर, तळोजा एमआयडीसी रोड येथे आरोपीत अतिश विष्णू रोकडे (वय - ३५) याने त्याच्या ताब्यातील टॅम्पो नं. एम एच.०३.सी व्ही. ४७७७ या मध्ये आरोपीत अकिब दावलकर राठी, समीर राठी आणि रौफ नमरे राठी यांच्याकडून अवैधरित्या आठ गोवंशीय जनावरे टॅम्पोमध्ये घेऊन जाताना व चार जनावरे नमूद आरोपींचे वाड्यावर मिळून आली. सदरचे जनावरेही वाहनामध्ये विना चारापाणी, औषध पेटीची व्यवस्था, ॲन्टीसेप्टीक मटेरिअल, वेस्ट मटेरिअल टॅक ठेवलेले नाहीत. तसेच शासनाची कोणत्याही वैध परवानगीशिवाय, जनावरांना क्रूरतापूर्वक वागणूक करून जनावरांचे कत्तल करण्याचे उद्देशाने घेऊन जाताना मिळून आल्याने तळोजा पोलिसांनी त्यांच्यावर कारवाई केली आहे. दरम्यान, जनावरे व टेम्पो असा मिळून ८ लाख २० हजारांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. याबाबत पुढील तपास तळोजा पोलीस करीत आहेत.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

*१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स*



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


# जेएसडब्ल्यूच्या वीजवाहिनीवर कारवाईची मागणी

## शेतकरी सुनील नावलेंचा आत्मदहनाचा इशारा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

मुंबई-गोवा महामार्गाच्या भूसंपादनात जमिनीचा मोबदला अद्याप न मिळूनही एका खासगी कंपनीसाठी त्या जागेतून वीजवाहिनी व मनोरे उभारणाऱ्या सर्व संबधितांविरोधात कारवाई करण्याची मागणी बाळसई येथील शेतकरी सुनील नावले यांनी भूसंपादन खात्याच्या उपजिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे. तसेच याप्रकरणी न्याय न मिळाल्यास त्याच जागेत आत्मदहन करण्यात येईल असा इशाराही सुनील नावले यांनी या निवेदनाद्वारे दिला आहे.

नागोठण्याजवळील कानसई येथील वीज उपकेंद्रातून डोलवी, ता.पेण येथील जेएसडब्लू कंपनीसाठी २२०/४०० के.व्ही. या उच्च वीज दाबाच्या वाहिनीसाठी विजेचे मनोरे व वीज वाहिनी टाकण्याचे काम ठेकेदाराकडून सुरु करण्यात आले आहे. मात्र हे करीत असतांना अनेक ठिकाणी शेतकऱ्यांना विश्वासात न घेतल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. असे असतांनाच नागोठण्याजवळील ऐनघर ग्रामपंचायत हद्दीतील बाळसई येथील नावले कुटुंबियांच्या गट नं. १२५/१ या सामायिक जागेतील साडेसात गुंठा जागेचे संपादीकरण मुंबई गोवा महामार्गासाठी करण्यासाठी नोटीसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र सदरील जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर सात नावे असतांना सहा जणांनाच नोटीसा काढण्यात आल्या होत्या. त्यामुळे सदर जमिनीच्या भूसंपादनाचा मोबदला देण्यासंबंधी शासनाच्या त्रुटींमुळे दिरंगाई झाली होती. सदर प्रकरणी भूसंपादन अधिकारी, जिल्हाधिकारी लवाद यांच्याकडे दाद मागूनही देय्य असलेला मोबदला नावले कुटुंबियांना मिळालेला नाही. याप्रकरणी नावले कुटुंबियांकडून सुनील नावले यांना अखत्यारी म्हणून नेमल्यानंतर त्यांनीही याप्रकरणी शासन दरबारी खेटे मारून न्याय मिळविण्याचा प्रयत्न केला मात्र त्यांना यश आले नाही.

दरम्यान, सन २००९ साली भूसंपादनाचे वेळी केवळ साडेसात गुंठे क्षेत्र संपादनाची नोटीस असताना सध्या आमच्या जागेतील १०.९० गुंठे एवढे जास्त क्षेत्र ७/१२ सदरी महामार्गाच्या नावे कसे झाले, असा प्रश्नही नावले यांनी उपस्थित केला असून, ही चुकीची व जास्त क्षेत्राची ७/१२ उतारा नोंद व आकारफोड रद्द करण्यात यावी, अशी मागणीही नावले यांनी केली आहे. याप्रकरणी महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, महामार्गाचे ठेकेदार व जेएसडब्लू कंपनीचे प्रशासन तसेच त्यांचे ठेकेदार कुणालाही जुमानत नसून उलट गुन्हे दाखल करण्याविषयी धमकावत असल्याचा आरोप नावले यांनी केला आहे. त्यामुळे हे मुगलशाही सरकार आहे का, असा प्रश्नही सुनील नावले यांनी उपस्थित केला असून, स्वतःच्याच जागेत आत्मदहन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे.



## समीर गुरव यांना पुरस्काराने सन्मानित

**। रसायनी । वार्ताहर ।**

लेक लाडकी अभियान महाराष्ट्र राज्य आयोजित भारत गौरव राष्ट्रप्रेरणा पुरस्कार २०२४ वितरण सोहळा नुकताच जल्लोषात मुंबई मराठी पत्रकार संघ लोकमान्य सभागृह मुंबई येथे संपन्न झाला. यावेळी सामाजिक क्षेत्रात कार्यरत असणारे समाजसेवक समीर जगन्नाथ गुरव यांना मुंबईच्या माजी महापौर किशोरीताई पेडणेकर यांच्या हस्ते भारत गौरव राष्ट्रप्रेरणा२०२४ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी चारुशीला देशमुख होत्या. तर प्रमुख पाहुण्या डॉ. मोनिका चोप्रा, सौंदर्य तज्ज्ञ स्वाती ओक, मुंबई मराठी पत्रकार संघ उपाध्यक्ष व पत्रकार स्वाती घोसाळकर, अभिनेता जाकिर खान, समाजसेविका संगीता ताई गुरव, संगीताताई गुंजाळ हे मान्यवर म्हणून उपस्थित होते. प्रत्येक मान्यवरांनी लेक लाडकी अभियान अंतर्गत महिलांच्या सक्षमीकरणावर आपापले विचार मांडले. या कार्यक्रमाचे संयोजक अध्यक्ष दिपक कलिंगण, पत्रकार व गायक सूरज भोईर, विजय भोसले, देवानंद कांबळे, प्रियांका भोईर, एन.ए. कदम यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. समीर जगन्नाथ गुरव यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# नागोठण्यात मतदानविषयक जनजागृती फेरी

**। नागोठणे । वार्ताहर ।**



लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यात सर्वत्र मतदानविषयक जनजागृती सुरू आहे. याचाच एक भाग म्हणून रोहा तालुक्यातील नागोठणे शहर व परिसरात मतदान विषयक जनजागृती मोहीम सोमवारी (दि.१) राबविण्यात आली. रायगड लोकसभा मतदार संघातील १९१-पेण विधानसभा मतदार संघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा पेण प्रांताधिकारी प्रवीण पवार, तसेच रोहाचे तहसीलदार डॉ. किशोर देशमुख, रोहाच्या निवडणूक नायब तहसीलदार उज्वला अंधेरे यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे शहरातील कोएसो. बापूसाहेब देशपांडे विद्यासंकुलातील अग्रवाल विद्यामंदिर व एस.पी. जैन ज्युनिअर कॉलेज, राजिप. नागोठणे शाळा क्र. १ च्या विद्यार्थ्यांनी सकाळी मतदान जनजागृती फेरी काढली.

या मतदान जनजागृती फेरीत विद्यार्थ्यांनी एका मताने बनते सरकार... एका मताने पडते सरकार, लोकशाहीची शान... तुमचे एक मतदान, मिळालेल्या अधिकाराचा सन्मान करुन मतदान करा, करा आपले मतदान...वाचवू संविधान अशा जनजागृतीपर घोषणा दिल्या. तर एस.पी. जैन ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी जनजागृतीपर पथनाट्य सादर केले. याशिवाय राजिपच्या नागोठणे, वांगणी व आमडोशी केंद्रातील प्रत्येक शाळेच्या एका शिक्षकाने सहभागी होत नागोठण्यात राजिप नागोठणे शाळा क्र. १ ते मच्छी मार्केट पर्यंत बाईला रॅली काढून मतदान जनजागृती केली. यावेळी रोहा पंचायत समितीच्या गट शिक्षणाधिकारी मेघना धायगुडे, नागोठणे मंडळ अधिकारी भारत गुंड, तलाठी गणेश विटेकर, शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# संतोष घरत यांची पवार गटाच्या सरचिटणीसपदी



**। उरण । वार्ताहर ।**

नवी मुंबई परिसरातील यशस्वी कामगार नेते संतोष घरत यांची राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार गट) पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी निवड करण्यात आली. संतोष घरत यांची प्रदेश सरचिटणीसपदी निवड होताच पक्षाचे नेते शरदचंद्र पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, प्रदेश नेते प्रशांत पाटील,भावना ताई घाणेकर यांनी त्यांचे अभिनंदन केले.

लोकनेते दि.बा.पाटील यांच्या तालमीत वाढलेल्या संतोष घरत यांनी जनमानसांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर प्रयत्न केले आहेत.ते एक उत्कृष्ट कामगार नेते म्हणून काम पाहत आहेत. त्यांनी नूकताच राष्ट्रवादी काँग्रेस ( शरदचंद्र पवार गट) पक्षात आपल्या सहकाऱ्यांसह जाहीर पक्ष प्रवेश केला. त्याच्या कार्याची दखल राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी घेऊन संतोष घरत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीसपदी निवड केली आहे. संतोष घरत यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस पदी निवड होताच विविध पक्षांच्या नेत्यांनी, कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी, शासकीय अधिकारी वर्गाबरोबर गावोगावचे आजी माजी सरपंच उपसरपंच यांनी त्यांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळविण्यात येते की, खालील वर्णन केलेली मिळकत ही आमचे आशिल यांचेसाठी श्री. निकित सतिश शिंदे, रा. पुणे शहर, जि. पुणे व श्री. मयुर चंद्रकांत कांडपिळे व श्री. गौरव चंद्रकांत कांडपिळे, रा. पनवेल, जि. रायगड यांनी खालील वर्णनाची जमीन व त्यावर असलेले व्यापारी व निवासी गाळे या मिळकतीच्या विद्यमान मालकांकडुन विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे माझे आशिलांचा खालील वर्णनातील मिळकतींच्या विद्यमाना मालकांबरोबर व्यवहार करण्याचे ठरलेले आहे. मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे-

**मिळकतीचे वर्णन**

| मालकाचे नाव | भुमापन क्रमांक व उपविभाग | गाव, तालुका व जिल्हा | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|---|
| श्री. संदिप चंद्रकांत पेडणेकर | २०/२३/१ | मौजे किहिम, ता. अलिबाग,जि.रायगड | ०-०५-०० | ०.०० |

त्यापैकी श्री. संदिप चंद्रकांत पेडणेकर यांचे ०.०२.०० इतके क्षेत्र व त्यावर सौ. धनश्री संदिप पेडणेकर यांचे मालकीचे असलेले व्यापारी गाळा क्र. २१८१/१, २१८१/२, २१८१/३, २१८१/४ व निवासी सदनिका क्र. २१८१/५

तरी श्री. संदिप चंद्रकांत पेडणेकर व सौ. धनश्री संदिप पेडणेकर यांचे ताबेकब्जे वहिवाटीतील व मालकीतील वर नमुद मिळकत ही या नोटीसचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, मृत्युपत्र, विक्रीचा करार, साठेकरार, पोटगी चार्ज, ताबा, वहीवाट, इजमेंट, बोजा तारण, वारस ट्रस्ट, कुळहक्क, कोणत्याही बँक कर्जाचा बोजा, अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानी प्रसिद्ध झालेपासून १५ दिवसांच्या आत खाली सही करणार यांचेकडे लेखी कळवावे. तशी कोणत्याही प्रकारची हरकत व तक्रार मुदतीत आमच्याकडे न आल्यास सदर मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध नाही असे मानण्यात येईल. मागाहून आलेल्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे सर्वास कळावे.

ठिकाण:- अलिबाग
दिनांक:- ०१/०४/२०२४
आशिलांची सही

**ॲड अभिषेक अनिल सावंत**
"साई अशिर्वाद सावंत हाऊस,
गोदावरी नगर चिंचपाडा, पेण
ता. पेण, जि. रायगड
मो. नं. ९९६७४३९३९८

## जाहीर नोटिस

सर्व जनतेस कळवण्यास येते की, आमचे आशिलांनी मौजे सासवणे, ता.अलिबाग येथील खालील वर्णनाच्या जमीन मिळकती, मिळकतीचे विद्यमान १ ) शिशीर शशिकांत संसारे २) शिला ल. खलप ३) शर्मिला स. शेट्ये ४) सचिन अ. कोळवणकर ५) स्वाती सु. भटनागर ६) शशांक अ. कोळवणकर ७) विशाल हणमशेट ८) विरेंद हणमशेट ९) वर्षा ज. कोरगावकर १०) निरव जयदिप कोरगावकर यांचेकडून विकत घेण्याचे ठरवून तसा विक्रीचा व्यवहार आमचे अशिल व विद्यमान मालक यांचेमध्ये ठरलेला आहे.

**मिळकतींचे वर्णन**

| मौजे | गट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|---|
| सासवणे | ४५५ | वरकस ०-०४-१० पो.ख. ०-०१-४० | ०.१० |
| सासवणे | ४८० | जिरायत ०-८०-६० पो.ख. ०-०८-१० | ५.४० |
| सासवणे | ४८१ | जिरायत २-६५-०० | १५.४० |

वर वर्णन केलेल्या जमीन मिळकती हा या नोटिसचा विषय आहे.

तरी वर वर्णन केलेल्या जमिन मिळकती विद्यमान मालकांच्या ताबे कब्जाच्या, वहिवाटीच्या, निर्वेध, बोजाविरहित, विकण्यायोग्य असल्याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिली आहे. तरी वरील मिळकतीं संबंधी कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, मालकी, गहाण, दान, बक्षिस, विक्रीचा करार, दावा, लिज, अन्नवस्त्र, हवाला, पोटगी, चार्ज, ताबा, वहिवाट, भाडेपट्टा, वाटणी, बोजा असल्यास अथवा त्यांची या व्यवहारास हरकत असल्यास आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे कालावधीत लेखी नोंदवावी. या कालावधीत कोणतीही हरकत न आल्यास आमचे अशिल सदरहू मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली कोणतीही हरकत आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग
दि.०२.०४.२०२४

**ॲड. मिलिंद चव्हाण**
८, आनंद अपार्टमेंट, श्रीबाग-३, अलिबाग

## जाहीर नोटीस

सर्व जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे, अलिबाग श्रीबाग ता.अलिबाग, नगरपरिषद अलिबाग हद्दीतील, कोकण गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ(म्हाडा) ने वितरीत केलेला निम्नलिखित वर्णनाचा भुखंड व त्यामधील अलिबाग नगरपरिषद घर मिळकत श्री.कृष्णा गोविंद जाधव रा.१२-बी, रत्न समूह एचआयजी, सीएचएस् न्यु डी.एन.नगर, सी.इ.एस.रोड, अंधेरी वेस्ट मुंबई-४०००५३ यांच्या मालकीचे असून, सदरील मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून माझे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, तशा आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिलां दरम्यान झालेला आहे. सदर जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. मात्र तरी देखील सदर मिळकतीवर अथवा त्यांचे कोणत्याही भागावर कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून पंधरा दिवसांचे अवधीत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | सर्व्हे नं | भुखंड क्र. | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| अलिबाग, ता.अलिबाग जि.रायगड | २९-अ/१ | १५८ | ७५ चौ.मी |

वर नमूद कोकण गृहनिर्माण क्षेत्रविकास मंडळ, बांद्रा मुंबई म्हाडा ने वितरीत केलेला भुखंड व अलिबाग नगरपरिषद घर मालमत्ता नवीन क्र. Z1AMHD002819 जुना मालमत्ता क्र.१४ म्हाडा या मिळकतीचे.

अलिबाग
दिनांक : ०१/०४/२०२४

सही/-
**(ॲड.वैभव वसंत पाटील)**
रा.नवेदर बेली, ता.अलिबाग
जि.रायगड, मो.९८५०२६१००८
खरेदीदाराचे वकील

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-टेकाळी, ता. अलिबाग, जि. रायगड गट नं. ९, एकूण क्षेत्र ०-४९-५० हे.आर., आकार ६.३४ रू.पै. ही मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक विनायक हरिश्चंद्र पाटील रा. मु. झिराड, भोईर आळी, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख ०१/०४/२०२४

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता-श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो, ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हण आळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती.भारती हरिश्चंद्र उर्फ हरेश मराडे याच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वडवली, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं ४ / १ / ग एकुण १० गुंठे जागा विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशिलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनांक : ०२/०४/२०२४

**ॲड देविदास यशवंत देवघरे**
पत्ता मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल श्री. धर्मेश जसवंत परमार, रा. कर्जत, शिवसृष्टी अपार्टमेंट, कोतवाल नगर, ता. कर्जत, जि. रायगड, ४१०२०१. यांनी खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली सदनिका मिळकत, त्या मिळकतीचे विदयमान मालकांकडुन कायम खरेदी घेण्याचे ठरविलेले आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड, येथील सदनिका मिळकत**

स.नं.८अ/१, प्लॉट नं.५+६, क्षेत्र ०.१०.६८ हे.आर.पॉ., आकार १३.२६ रू.पै., या मिळकतीवर बांधण्यात आलेल्या "शिव सृष्टी" अपार्टमेंटमधील पहिल्या मजल्यावरील सदनिका नं. १०८ व १०९, क्षेत्र ८०४ चौ. फुट बिल्ट अप.

वर वर्णन केलेल्या सदनिका मिळकतीच्या संदर्भात अन्य कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा गहाण, दान, साठेकरार, करारनामा, विकसन करारनामा, मुखत्यारपत्र, विसारपावती, खरेदीखत, सहभागीदार, वहिवाटदार, भाडेकरार, जागा वापर परवाना, पोटगी, लीज, लीन आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास व त्यांची हरकत असल्यास त्यांनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानीशी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन होणाऱ्या २१ (एकविस) दिवसांच्या मुदतीत खालील सही करणार यांजकडे लेखी स्वरूपात कळवावी. येणे प्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची सदनिका मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजुन आमचे अशिल सदर मिळकतीच्या खरेदी विक्रीचा व कायदेशीर हस्तांतराचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कर्जत
दिनांक :- ०२/०४/२०२४.

सही /-
**ॲड. उषा जे.कांबळे.**
कर्जत,"पुष्प विमल" निवास,
नानामास्तर नगर, मुद्रे.
मो. नं. ७३८५००४८०६.

## निवडक

### रोहितसाठी खास पोस्ट

**मुंबई :** आयपीएलच्या हंगामात मुंबई इंडियन्सची सुरुवात नेहमीप्रमाणे खूपच खराब झाली. कर्णधार हार्दिक पांड्याच्या नेतृत्वाखाली मुंबईने पहिले दोन्ही सामने गमावले. याचदरम्यान आता समालोचकाची भूमिका बजावणारे नवज्योतसिंह सिद्धू यांनी सोशल मीडियावर रोहित शर्मासाठी एक पोस्ट शेअर केली आहे. त्यांच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर रोहित शर्माचा एक व्हिडिओ शेअर केला आहे. यासोबतच त्यांनी कॅप्शनमध्ये लिहिले की, हत्ती धुळीने माखलेला असला तरी त्याचा सन्मानच केला जातो.

### संघमालकांची बैठक

**नवी दिल्ली :** बीसीसीआयने अचानक आयपीएल संघमालकांची एक बैठक बोलवली आहे. ही बैठक अहमदाबादमध्ये १६ एप्रिल रोजी होणार आहे. बैठकीत अनेक धोरणात्मक निर्णयाबाबत चर्चा होणार आहे. प्रामुख्याने आयपीएलचं भविष्य आणि खेळाडूंच्या रिटेंशन, लिलाव आणि सॅलरी कॅपबद्दल चर्चा होण्याची शक्यता आहे. बीसीसीआयने प्रत्येक फ्रेंचायजी मालकांना बैठकीचं निमंत्रण पाठवलं आहे. हे सर्व संघमालक आपल्या सीईओ आणि कार्यकारी स्टाफसह बैठकीला हजर राहतील अशी अपेक्षा आहे.

### धोनीचा शेवटचा हंगाम?

**नवी दिल्ली :** आयपीएलच्या हंगामाला सुरुवात होण्यापूर्वीच चेन्नई संघात नेतृत्वबदल पाहायला मिळाला. धोनीने कर्णधारपदावरून पायउतार होत नेतृत्वाची जबाबदारी ऋतुराज गायकवाडच्या खांद्यावर सोपवली. दरम्यान, धोनीने हा निर्णय का घेतला असावा, याबाबत भारताचे माजी क्रिकेटपटू रवी शास्त्री यांनी मत मांडले आहे. त्यांच्यामते 'यंदा धोनीचा अखेरचा हंगाम आहे, हे खूप स्पष्ट आहे. त्याचे शरीर त्याला कसे साथ देत आहे, तो पूर्ण हंगाम खेळणार की नाही, हे फक्त वेळच सांगेल.'

### मीराबाई ऑलिम्पिक पात्र

**नवी दिल्ली :** टोकियो ऑलिम्पिकमध्ये कांस्य पदक जिंकणारी भारताची वेटलिफ्टर मीराबाई चानूने आज आयडब्ल्यूएफ वर्ल्डकप महिला ४९ किलो वजनी गटात तिसऱ्या स्थानावर राहिली. याचबरोबर मीराबाईने पॅरिस ऑलिम्पिक पात्रतादेखील मिळवली आहे. मीराबाई दुखापतीमुळे स्पर्धांपासून लांब होती. अखेर सहा महिन्यांनी ती परतली आणि तिने एकूण १८४ किलो वजन उचलले. पॅरिस ऑलिम्पिक पात्रता मिळवण्यासाठीची ही शेवटची वेटलिफ्टिंग स्पर्धा होती.

### बटलरने बदलले नाव

**नवी दिल्ली :** इंग्लंड क्रिकेट संघाचा कर्णधार जोस बटलरने आपले नाव बदलण्याचा निर्णय घेतला आहे. बटरलने आपले नाव जोस वरून जोश असे करत असल्याचा व्हीडिओ इंग्लंड क्रिकेटने शेअर केला आहे. इंग्लंड क्रिकेट बोर्डाने एका व्हिडिओच्या मदतीने ही घोषणा केली. व्हीडिओची सुरुवात बटलरने स्वतःच्या आईसह अनेकजण गेल्या बऱ्याच वर्षांपासून त्याचे नाव चुकीचे कसे उच्चारले जाते ते सांगितले आणि शेवटी मी माझे नाव बदलत असल्याची घोषणा त्याने केली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक

# जय मल्हार संघाची बाजी

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**
**गोविंदबंदर येथील नालंदा बुध्दविहार आयोजित मिलींद जाधव, मनिंदर बाडवाल, कपिल गायकवाड यांच्यावतीने अलिबाग शहरातील क्रिडा भवनच्या प्रांगणात दोन दिवस क्रीकेट स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत प्रथम क्रमांक जय मल्हार संघाने मिळविला असून हा संघ डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषकाचा मानकरी ठरला. यावेळी अक्षय्या प्रशांत नाईक व माजी नगरसेवक अनिल चोपडा यांच्या हस्ते या संघाला चषक देऊन गौरविण्यात आले.**



भारतीय राज्य घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक क्रिकेट स्पर्धा शनिवार व रविवार अशी दोन दिवस घेण्यात आली. अलिबाग शहरातील क्रीडा भुवनच्या प्रांगणात ही स्पर्धा रंगली. अलिबाग तालुक्यातील ग्रामीण व शहरी भागातील १६ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते. दोन दिवस अलिबागच्या मैदानात रंगलेल्या या स्पर्धेत वेगवेगळ्या संघाने आपली कामगिरी बजावत विजय संपादन करण्याचा प्रयत्न केला. अंतिम सामना रविवारी (दि.३१) मार्च रोजी सायंकाळी झाला. त्यामध्ये जय मल्हार संघाने अंतिम सामना जिंकून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चषक मिळविला. या संघाला प्रथम क्रमांकाचे रोख ५१ हजार रुपये व चषक तसेच, थळमधील आरसी संघाला द्वीतीय क्रमांकाचे ३१ हजार रुपये व चषक देऊन सन्मानित करण्यात आले.

## छत्रपती शिवाजी महाराज चषक

# श्री महागणपती क्रिकेट संघ विजयी

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**
उरण तालुक्यातील धाकटीजुई येथील फ्रीडम ग्रुप व मैत्री मिलिंद, विनोद स्पोर्ट्सच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या नाईट क्रिकेट स्पर्धेचे अजिंक्यपद श्री महागणपती चिरनेर क्रिकेट संघाने पटकाविले. त्यांना प्रथम क्रमांकाचे छत्रपती शिवाजी महाराज चषक व १ लाख रुपये असे पारितोषिक मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

तसेच, उपविजेतेपद गावदेवी पेण क्रिकेट संघाने जिंकले. त्यांना ५० हजार रुपये व छत्रपती शिवाजी महाराज चषक देण्यात आले. विनोद स्पोर्ट्स गावठाण क्रिकेट संघाने तृतीय क्रमांक पटकाविला. त्यांना २५ हजार रुपये व छत्रपती शिवाजी महाराज चषक देण्यात आले. तर, अक्कादेवी मोठीजुई क्रिकेट संघाने चतुर्थ क्रमांक पटकाविला. त्यांना २५ हजार रुपये व छत्रपती शिवाजी महाराज चषक प्रदान करण्यात आले.



याशिवाय चिरनेरच्या संघातील साहिल चव्हाण या खेळाडूला मालिकावीर, गावठाण संघातील अंकुश टकले या खेळाडूला उत्कृष्ट गोलंदाज, मोठीजुई संघातील अंकेश कामोठकर या खेळाडूला उत्कृष्ट फलंदाज तर कळवे पेणच्या संघातील सुशांत मोकल या खेळाडूला उत्कृष्ट क्षेत्ररक्षकाचा किताब देण्यात आला.

या क्रिकेट स्पर्धेत एकूण ३८ संघानी आपला सहभाग नोंदविला होता. तसेच, प्रत्येक सामन्यासाठी सामनावीर चषक देण्यात आला. या स्पर्धेसाठी नामांकित पंच व उत्कृष्ट समालोचक यांना निमंत्रित करण्यात आले होते. फ्रीडम ग्रुप व मैत्री मिलींद, विनोद स्पोर्ट्स संघ धाकटीजुई मार्फत क्रिकेट स्पर्धा यशस्वीरित्या पार पडली.

# चौलमळा येथे रंगणार क्रिकेटचा थरार

### ■ रविवारी रवींद्र घरत, महेंद्र नाईक यांच्या हस्ते शुभारंभ

**। चौल । प्रतिनिधी ।**
अलिबाग तालुक्यातील चौलमळा येथे रविवार, दि. ७ एप्रिल रोजी चौलमळा प्रीमियर लीगचे आयोजन करण्यात आले आहे. चौलमळा क्रिकेट संघातील खेळाडूंच्या संकल्पनेतून पहिल्यांदाच ही स्पर्धा चौल-पाझर येथील मैदानावर खेळविण्यात येणार आहे. गावातील तरुण पिढीमध्ये एकोपा व एकमेकांबद्दल जिव्हाळा राहावा, हीच या स्पर्धेमागची भावना आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन गावप्रमुख रवींद्र घरत, कृष्णादेवी युवक मंडळाचे अध्यक्ष महेंद्र नाईक यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती आयोजकांनी दिली. यावेळी गावचे उपप्रमुख जितेंद्र पाटील, भजन मंडळाचे अध्यक्ष तथा युवक मंडळ उपाध्यक्ष अल्पेश म्हात्रे, भजन मंडळ उपाध्यक्ष अंजेश घरत, अन्य सहकारी, प्रतिष्ठित ग्रामस्थ आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



ही स्पर्धा चौलमळा गावापुरती मर्यादित असून, गावातील तरुणांचे सहा संघ सहभागी होणार आहेत. आयपीएलच्या धर्तीवर प्रत्येक संघाची मालकी देण्यात आली आहे. त्यात संघमालक शैलेश नाईक (काव्या चॅलेंजर्स), सुजित नाईक (जित ट्रान्स्पोर्ट), मोहन घरत (अलिबाग बीच कॅम्पिंग), सचिन आमरे (रिया टायगर), मंदार नाईक (श्री कृष्णादेवी प्रसन्न), सुनील घरत (श्री माऊली केबल नेटवर्क) या संघांचा समावेश असणार आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी आयोजक चौलमळा क्रिकेट संघाचे अनिकेत म्हात्रे, जयेंद्र म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्य सहकारी मेहनत घेत आहेत.

### ऋषभ पंतवर दंडात्मक कारवाई

**विशाखापट्टणम :** आयपीएल स्पर्धेत रविवार दि.३१ मार्च रोजी तेरावा सामना चेन्नई विरुद्ध दिल्ली संघात पार पडला. विशाखापट्टणमला झालेल्या या सामन्यात दिल्लीने २० धावांनी विजय मिळवला. मात्र, या विजयानंतरही दिल्लीला एक मोठा धक्का बसला आहे. दिल्लीचा कर्णधार ऋषभ पंतला दंडात्मक कारवाईला सामोरे जावे लागले आहे. त्याच्यावर १२ लाखाचा दंड ठोठावण्यात आला आहे. चेन्नईविरुद्धच्या या सामन्यात दिल्लीकडून षटकांची गती कमी राखली गेल्याने ही कारवाई करण्यात आली आहे.

# किशोरी गट राष्ट्रीय कबड्डी स्पर्धा; महाराष्ट्राची कर्नाटकवर मात

**। मुंबई । प्रतिनिधी ।**
महाराष्ट्राच्या मुलींना ३३व्या राष्ट्रीय किशोरी गट कबड्डी स्पर्धेमधील 'फ' गटात उत्तरांचल बरोबर ६८-६८ अशा बरोबरीत समाधान मानावे लागले. पटणा बिहार येथील पाटली पुत्र क्रीडा संकुलात सुरू झालेल्या किशोरी गटाच्या सामन्यात महाराष्ट्राला सुरुवातीपासून कडवा संघर्ष करावा लागला. क्षणा क्षणाला उत्कंठावर्धक ठरलेल्या या सामन्यात गुणफलक सतत दोलायमान स्थितीत पुढे सरकत होता. पण पहिला लोण देत उत्तरांचलने १७-१५ अशी आघाडी घेतली. पुन्हा आणखी एक लोण देत उत्तरांचलने आपली आघाडी २७-१९ अशी वाढविली. विश्रांतीला ४४-३३ अशी उत्तरांचलकडे आघाडी होती. विश्रांतीनंतर सामन्यातील रंगत आणखी वाढत गेली. सामना संपायला काही मिनिटे बाकी असताना महाराष्ट्राच्या मोनिका पवारने उत्तरांचलला पहिला झटका दिला. तिने उत्तरांचलचे बोनससह ३ गडी टिपत पहिला लोण देत महाराष्ट्राची पिछाडी ६४-६५ अशी कमी केली. पण त्याचे विजयात रुपांतर करणे त्यांना जमले नाही. शेवटी महाराष्ट्राला बरोबरीत समाधान मानावे लागले.

रात्री उशीरा झालेल्या दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्राने कर्नाटकचे आवाहन ४१-२९ असे परतवून लावत बाद फेरीतील आपला प्रवेश जवळपास निश्चित केला. पहिल्या डावात २४-१२ अशी आघाडी घेणाऱ्या महाराष्ट्राने दुसऱ्या डावात सावध खेळ करीत विजय आपल्या हातून निसटून दिला नाही. मोनिका पवार, बिंदिसा सोनार यांनी चढाईत गुण घेण्याचा आपला सपाटा दुसऱ्या सामन्यात देखील चालूच ठेवला. पण बचावात पुन्हा एकदा त्यांना अपयश आले. पण या विजयाने महाराष्ट्राचा बाद फेरीतील मार्ग मात्र मोकळा होईल असे वाटते. कारण आता त्यांचा सामना दुबळ्या ओरिसा संघाशी होणार आहे.

### मुंबईच्या खेळाडूंची आगेकूच

**मुंबई :** मुंबईच्या खेळाडूंनी महाराष्ट्र राज्य मानांकन कॅरम स्पर्धेत शानदार कामगिरी करीत उपांत्य फेरीत प्रवेश केला. महम्मद घुफ्रान, पंकज पवार, प्रशांत मोरे या मुंबईकरांसह संदीप दिवे या मुंबई उपनगरच्या खेळाडूने या स्पर्धेत अंतिम चारमध्ये प्रवेश केला. पुरुष एकेरीच्या उपउपांत्य सामन्यात घुफ्रानने पुण्याच्या रहीम खानवर मात करत आगेकूच केली. मुंबईच्या पंकज पवारने पुण्याच्या अभिजित त्रिपनकरवर तीन सेटमध्ये विजय मिळवून उपांत्य फेरीत धडक मारली. मुंबई उपनगरच्या संदीप दिवे याने मुंबईच्या अशोक गौर याच्यावर मात केली. तसेच, मुंबईच्या प्रशांत मोरे याने ठाण्याच्या झैद फारूकी याला नमवले.

# पाकिस्तानच्या कॅप्टन्सीचा वाद टिपेला

**। लाहोर । वृत्तसंस्था ।**
पाकिस्तान क्रिकेट वर्तुळातील कर्णधारपदावरून उठलेलं वादंग आता वेगळ्या दिशेला जात आहे. काही महिन्यावरच टी-२० वर्ल्डकप आहे अन् पीसीबीने शाहीन आफ्रिदीला टी-२० संघाच्या कर्णधारपदावरून हटवले आहे. बाबर आझम पुन्हा एकदा कर्णधार झाला आहे. मात्र, शाहीन आफ्रिदी पीसीबीने हे प्रकरण ज्या प्रकारे हाताळले त्यावर नाराज आहे.



बाबर आझमला पुन्हा एकदा टी-२० संघाचा कर्णधार केल्यानंतर पीसीबीच्या वेबसाईटवर शाहीनचं एक वक्तव्य प्रसिद्ध केलं होतं. या वक्तव्यानंतरच शाहीन आफ्रिदी नाराज झाल्याचं सूत्रांनी सांगितले. या वक्तव्यात शाहीन आफ्रिदीने बाबर आझमला पुन्हा टी-२०चा कर्णधार करण्याला आपला पूर्ण पाठिंबा असल्याचं म्हटलं आहे. मात्र, शाहीननं असं कोणतंही वक्तव्य दिलेलं नाही. या वक्तव्यातील पाकिस्तानचं नेतृत्व करायला मिळणं हा सन्मान अन् बाबर आझमला संपूर्ण पाठिंबा यावर शाहीनचा आक्षेप आहे.

आफ्रिदीची नाराजी ही खोट्या वक्तव्याच्या पलीकडील आहे. शाहीनला असं वाटतं की, पीसीबीने त्याला कर्णधारपदावरून का हटवलं, याचं योग्य स्पष्टीकरण दिलेलं नाही. पीसीबीकडून स्पष्ट असा संवाद साधण्यात आला नाही. त्यामुळे संघात परस्पर विश्वासाचा अभाव आणि नैराश्य आले आहे.

# बांगलादेशच्या क्षेत्ररक्षकांचा गोंधळ

**। चितगाव । वार्ताहर ।**
बांगलादेश विरुद्ध श्रीलंका संघात कसोटी मालिकेतील दुसरा सामना ३० एप्रिलपासून चितगावला सुरू झाला आहे. या सामन्याच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे रविवारी (३१ मार्च) बांगलादेशच्या क्षेत्ररक्षकांकडून एक गमतीशीर चूक झाली. या सामन्यात श्रीलंकेने पहिल्या डावात शानदार फलंदाजी केली. दरम्यान, श्रीलंकेच्या पहिल्या डावात ६ बाद ४१९ धावा झालेल्या असताना १२१ व्या षटकात श्रीलंकेचा फलंदाज प्रभात जयसुर्या खलीद अहमदच्या गोलंदाजीचा सामना करत होता. यावेळी खलीदने टाकलेला चेंडू प्रभातच्या बॅटची कड घेत मागे गेला. यावेळी पहिल्या स्लीपमध्ये क्षेत्ररक्षण करत असलेल्या कर्णधार नजमुल हुसेन शान्तोकडून झेल सुटला आणि हवेत उडाला. यावेळी स्लीपलाच क्षेत्ररक्षण करत असलेल्या शहादत हुसेन दिपूने झेल घेण्याचा प्रयत्न केला, परंतु, त्यालाही त्यात अपयश आले. त्यानंतर झाकिर हसननेही झेलसाठी डाईव्ह मारली, परंतु त्याच्याही हातात चेंडू आला नाही. अखेर प्रभातला जीवदान मिळाले.

# भारतीय कुस्ती संघटनेचा स्वबळाचा नारा

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
जागतिक कुस्ती संघटनेकडून निलंबन मागे घेण्यात आल्यानंतर भारतीय कुस्ती संघटनेने विशेष सर्वसाधारण बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेतला. केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून निलंबन मागे न घेण्यात आल्यास सरकारी मदतीशिवाय कुस्ती संघटनेचे कामकाज सुरू राहील, अशी भूमिका याप्रसंगी त्यांच्याकडून घेण्यात आली आहे.

भारतीय कुस्ती संघटनेने निवडणुकीदरम्यान नियम मोडल्याचे कारण पुढे करीत केंद्रीय क्रीडा मंत्रालयाकडून त्यांना निलंबनाची शिक्षा सुनावण्यात आली. मात्र, जागतिक कुस्ती संघटनेकडून त्यांचे निलंबन मागे घेण्यात आल्यानंतर भारतीय कुस्ती संघटनेकडून विशेष सर्वसाधारण बैठकीचे आयोजन करण्यात आले. नॉयडा येथे या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला २५ संलग्न राज्य संघटनेचे पदाधिकारी उपस्थित होते. सरचिटणीस प्रेम चंद लोचाब यांची या बैठकीला अनुपस्थिती होती.




## विदित, प्रज्ञानंद, गुकेश, हम्पी, वैशाली यांचे सर्वस्व पणाला

# प्रतिष्ठेच्या 'कॅंडिडेट्स' स्पर्धेत यंदा कोणाची बाजी?

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**
**बुद्धिबळातील अतिशय प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या 'कॅन्डिडेट्स' म्हणजेच आवाहनवीरांच्या स्पर्धेला ३ एप्रिलपासून कॅनडा येथील टोरंटो येथे प्रारंभ होणार आहे. यंदाची स्पर्धा भारतासाठी खूपच खास ठरणार आहे. प्रथमच एकापेक्षा अधिक भारतीय बुद्धिबळपटू या स्पर्धेत सहभाग नोंदवतील. खुल्या विभागातील आठपैकी तीन, तर महिला विभागातील आठपैकी दोन बुद्धिबळपटू भारतीय असतील. त्यामुळे भारतीय बुद्धिबळाची सामर्थ्य दाखवणारी अशी ही स्पर्धा ठरू शकेल.**



### बुद्धिबळातील अतिशय प्रतिष्ठेची स्पर्धा

'कॅन्डिडेट्स' स्पर्धेतील विजेत्या बुद्धिबळपटूला जागतिक अजिंक्यपदाच्या लढतीत सध्याच्या जगज्जेत्याला आवाहन देण्याची संधी मिळते. सध्या पुरुषांमध्ये डिंग लिरेन आणि महिलांमध्ये जू वेन्जून हे चीनचे बुद्धिबळपटू जगज्ज्रेते आहेत. या दोघांविरुद्ध खेळण्याची संधी मिळवण्यासाठी 'कॅन्डिडेट्स' स्पर्धेत पुरुष आणि महिला विभागात प्रत्येकी आठ बुद्धिबळपटू आपले सर्वस्व पणाला लावतील.

### 'कॅन्डिडेट्स' स्पर्धेचे स्वरूप

'कॅन्डिडेट्स' स्पर्धा ३ ते २२ एप्रिल या कालावधीत टोरंटोतील 'द ग्रेट हॉल' या ठिकाणी खेळवली जाणार आहे. पहिल्या दिवशी केवळ उद्घाटन समारंभ असेल. ४ एप्रिलपासून सामन्यांना सुरुवात होईल. खुल्या व महिला विभागातील आठ बुद्धिबळपटू एकमेकांविरुद्ध प्रत्येकी दोन असे एकूण 14 डाव खेळतील. प्रत्येक बुद्धिबळपटूला अन्य सात बुद्धिबळपटूंविरुद्ध एकदा पांढऱ्या मोहऱ्यांनी आणि एकदा काळ्या मोहऱ्यांनी खेळण्याची संधी मिळेल. चौथ्या, सातव्या, दहाव्या आणि बाराव्या फेरीनंतर विश्रांतीचा दिवस असेल. चौदाव्या फेऱ्यांअंती सर्वाधिक गुण असलेला विजेता ठरेल.




**कृषीवल** हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ I MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)